

डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२६




दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# शरद पवारांनी घेतली सुनेत्रा पवारांची भेट

### सहयोग सोसायटीत पवार कुटुंब एकत्रित, लाडक्या पुतण्याच्या प्रतिमेला काकांनी वाहिली श्रद्धांजली



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना भेटण्यासाठी निघाले असल्याची माहिती समोर आली आहे. बारामती येथील सहयोग सोसायटी येथे जाऊन शरद पवार सुनेत्रा पवारांची भेट घेणार आहेत. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर ही पहिलीच भेट असणार आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगल्या असतानाच या भेटीकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

शरद पवार सहयोग सोसायटी येथे दाखल झाल्यानंतर त्यांनी अजित पवारांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. सुरक्षा रक्षकाच्या हाताला हात धरुन शरद पवार पुढे आले. त्यानंतर, अजित पवारांच्या प्रतिमेसमोर डोकं खाली करुन हात जोडले. आपल्या लाडक्या पुतण्याला काकांकडून श्रद्धांजली वाहताना संपूर्ण पवार कुटुंबीय भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होण्यापूर्वी हीच सहयोग सोसायटी राजकीय घडामोडींचे केंद्रबिंदू ठरले होते. अजित पवारांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात अनेक बदल झाले. यावेळी सहयोग सोसायटी, गोविंदबाग आणि मुंबईतील देवगिरी बंगला येथील घडामोडी अत्यंत वेगाने घडल्याचे पाहायला मिळाले.

अजित पवारांचे निधन झाल्यानंतर शरद पवार बारामतीमध्ये पुन्हा सक्रिय झाल्याचे पाहायला मिळाले. अस्थीविसर्जनाच्या दिवशी शरद पवार नीरा नदीच्या पाहणीसाठी गेले होते. यावेळी त्यांनी स्थानिक कार्यकर्त्यांकडून नदीतील दूषित पाण्याची माहिती घेतली होती. शरद पवार तसेच शरद पवार गटातील नेत्यांची दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्याची इच्छा आहे. तर दुसरीकडे अजित पवार गटातील नेत्यांनी आम्ही एनडीएसोबतच राहणार असल्याचा निर्धार केला आहे. तसेच छगन भुजबळ यांनी तर थेट म्हटले होते की दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत भाजपला विचारावे लागेल. यावरून देखील शरद पवारांनी आक्षेप घेत म्हटले होते की, राष्ट्रवादीबाबतच्या प्रश्नात मुख्यमंत्र्यांची भूमिका काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता.

आता शरद पवार हे सुनेत्रा पवार यांची भेट घेण्यासाठी सहयोग सोसायटीकडे जाण्यास निघाले आहेत. दोघांमध्ये काय चर्चा होते? विलीनीकरण होणार का? तसेच शरद पवार पुन्हा एकदा भाकरी फिरवणार का? याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे.

### कौटुंबिक भेट

तर दुसरीकडे ही कौटुंबिक भेट असल्याचे देखील बोलले जात आहे. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री बनवण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यामुळे कौटुंबिक भेट झाली नव्हती म्हणून आज पवार कुटुंब सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी जमले असल्याचे समजते.

## एक्स्प्रेस वेसाठी आता 'इमर्जन्सी प्लॅन'; एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटात झालेल्या गॅस टँकरच्या अपघातामुळे हजारो प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला. या घटनेची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत गंभीर दखल घेतली असून, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तत्काळ विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा' तयार करण्याचे निर्देश एमएसआरडीसी आणि पोलीस प्रशासनाला दिले आहेत. तसेच, जोपर्यंत वाहतूक पूर्णपणे पूर्वपदावर येत नाही, तोपर्यंत या महामार्गावरील टोल वसुली थांबवण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. बोरघाटात प्रोपोलीन गॅसचा टँकर उलटल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गॅस गळती सुरू झाली होती. हा वायू अत्यंत ज्वलनशील असल्याने मोठा स्फोट होऊन जीवितहानी होण्याची भीती होती. "प्रवाशांना झालेला त्रास दुर्दैवी आहे, पण तिथे जीवितहानी टाळणे हे आमचे पहिले कर्तव्य होते," असे उपमुख्यमंत्री म्हणाले. एमएसआरडीसी आणि पोलिसांनी सलग २० तास प्रयत्न करून ही गळती रोखली. या कामासाठी एनडीआरएफसहभारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि रिलायन्सच्या तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते.



वाहतूक कोंडीत अडकलेल्या प्रवाशांचे हाल होऊ नयेत म्हणून उपमुख्यमंत्र्यांनी टोल वसुली थांबवण्याचे निर्देश दिले. या काळात एमएसआरडीसीच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून प्रवाशांना पिण्याचे पाणी आणि बिस्किटांचे वाटप केले. परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत सर्व अधिकारी रस्त्यावरच ठाण मांडून होते.

एक्स्प्रेस वेवरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी आणि अशा आपत्कालीन स्थितीत पर्यायी मार्ग उपलब्ध व्हावा म्हणून 'मुंबई-पुणे मिसिंग लिंक'चे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. हे काम आता अंतिम टप्प्यात असून, ही लिंक सुरू झाल्यावर प्रवासाचा वेळ वाचण्यासोबतच घाट विभागातील वाहतूक कोंडीची समस्याही कायमची सुटण्यास मदत होणार आहे.

भविष्यात असे अपघात झाल्यास वाहतूक नेमकी कुठे वळवायची, पर्यायी मार्ग किती वेळात उपलब्ध करून द्यायचे आणि बचाव यंत्रणा किती वेगाने पोहोचतील, याचा सविस्तर आराखडा तयार करण्यास सांगण्यात आले आहे. "प्रवाशांची सुरक्षा आणि त्यांचा वेळ आमच्यासाठी महत्त्वाचा आहे," असे ठाम मत उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केले.

## युमनाम खेमचंद सिंह बनले मणिपूरचे 13 वे CM

- **नागा समुदायाचे लोसी दिखो-कुकीमधून नेमचा किपगेन बनले DCM, 356दिवसांनी राष्ट्रपती राजवट हटवली**

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**

भाजप नेते युमनाम खेमचंद सिंह मणिपूरचे १३ वे मुख्यमंत्री बनले आहेत. राज्यपाल अजय कुमार भल्ला यांनी बुधवारी संध्याकाळी लोकभवन येथे खेमचंद यांना गोपनीयतेची शपथ दिली. मैतेई समुदायाचे असलेले खेमचंद हे माजी मुख्यमंत्री बिरेन सिंग यांचे जवळचे मानले जातात. नागा आमदार लोसी दिखो यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ते नागा पीपल्स फ्रंटचे सदस्य आहेत. कुकी समुदायाच्या सदस्या नेमचा किपगेन यांनीही उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.



त्यांनी दिल्लीतील मणिपूर भवन येथून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आहेत. राज्यात पुन्हा एकदा एनडीए सरकार स्थापन झाले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राज्यातील ३५६ दिवसांपासून लागू असलेली राष्ट्रपती राजवट उठवली. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी मणिपूरमधील मैतेई आणि कुकी समुदायांमधील वांशिक हिंसाचारामुळे तत्कालीन मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी राजीनामा दिला.

चार दिवसांनंतर, १३ फेब्रुवारी २०२५ पासून राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. दरम्यान, राज्याच्या गृहमंत्रीपदासाठी कोन्थोजम गोविंददास सिंह यांचे नाव चर्चेत आहे.

## भारत 10 व्यांदा अंडर-19 वर्ल्डकप सेमीफायनलमध्ये

### 6 तारखेला इंग्लंडशी सामना, अफगाणिस्तानला 7 विकेटनी हरवले, आरोन जॉर्जचे शतक



**(समर्थ गांवकरी)**

भारताने १०व्यांदा १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. बुधवारी, दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा ७ विकेट्सने पराभव केला. ६ फेब्रुवारी रोजी टीम इंडिया इंग्लंडशी सामना करेल.

हरारे स्पोर्ट्स क्लब येथे झालेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने ५० षटकांत ४ विकेट्स गमावून ३१० धावा केल्या. फैसल शिनोजादा (११० धावा) आणि उजैरुल्लाह नियाझाई (नाबाद १०१ धावा) यांनी शतके केली. भारताकडून दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

३११ धावांच्या प्रत्युत्तरात, भारताने सलामीवीर आरोन जॉर्ज (११५ धावा) यांच्या शतकाच्या जोरावर ४१.१ षटकांत ३ विकेट्सने विजय मिळवला. वैभव सूर्यवंशी (६८ धावा) आणि कर्णधार आयुष म्हात्रे (६२ धावा) यांनी अर्धशतके केली.

## कुणाल कामरा आणि सुषमा अंधारेंना विधान परिषदेचे समन्स

### एकनाथ शिंदेंची नक्कल पडली महागात!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री (तत्कालीन मुख्यमंत्री) एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी आणि विडंबन गाणे तयार केल्याप्रकरणी कॉमेडियन कुणाल कामरा याच्या अडचणीत वाढ झाली आहे. याप्रकरणी महाराष्ट्र विधान परिषदेच्या विशेषाधिकार समितीने कुणाल कामरा आणि शिवसेना (ठाकरे गट) नेत्या सुषमा अंधारे यांना समन्स बजावले आहे. मार्च २०२५ मध्ये कुणाल कामरा याने एका स्टँड-अप शो दरम्यान 'दिल तो पागल है' या गाण्याच्या चालीवर एक विडंबन गाणे तयार केले होते. या गाण्यातून त्याने एकनाथ शिंदे यांच्यावर 'गद्दार' अशी टीका केली होती. या कृत्याबद्दल भाजप आमदार प्रसाद लाड आणि प्रवीण दरेकर यांनी विशेषाधिकार भंगाची नोटीस दिली होती. सुषमा अंधारे यांनी या गाण्याचे आणि कामराचे समर्थन केल्यामुळे त्यांनाही या प्रकरणात घेण्यात आले आहे. विशेषाधिकार समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी सांगितले की, कामरा आणि अंधारे यांना १५ दिवसांपूर्वीच नोटीस पाठवण्यात आली होती. आता



त्यांना उद्या, गुरुवार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता समितीसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जर ते हजर राहिले नाहीत, तर समिती त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेऊ शकते. कुणाल कामराच्या या पॅरोडी गाण्यामुळे यापूर्वी मोठा वाद झाला होता. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी तो ज्या स्टुडिओमध्ये शूट झाला होता, तिथे तोडफोडही केली होती. आता हे प्रकरण विधान परिषदेच्या समितीपर्यंत पोहोचल्याने पुन्हा एकदा अभिव्यक्ती स्वातंत्र्य विरुद्ध विशेषाधिकार असा वाद रंगण्याची चिन्हे आहेत.

# राज्यातील १००० व अहिल्यानगर जिल्ह्यातील ७१ सचिवांचे प्रश्न मार्गी लागणार : गणेश रेवगडे

### दैनिक समर्थ गांवकरी इम्पॅक्ट !

**(समर्थ गांवकरी)**

राज्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांमधील तब्बल १००० सचिव तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील ७१ सचिवांच्या प्रलंबित केडर ऑर्डर संदर्भातील सर्व प्रश्न येत्या आठ दिवसांत निश्चितपणे मार्गी लावण्यात येतील, असा ठाम विश्वास विविध कार्यकारी सेवा सोसायटी संघटनेचे संस्थापक व राज्याध्यक्ष माननीय गणेशजी रेवगडे यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील शिखर संस्थांची मातृसंस्था असलेल्या विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांकडे 'केडर' संदर्भातील काही ऑर्डर प्रलंबित होत्या. या प्रश्नासाठी राज्य संघटनेने सुरुवातीपासून सातत्याने पाठपुरावा केला असून राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री पंकज भोईर तसेच सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी वर्गाने या विषयात मोलाचे सहकार्य केल्याचे रेवगडे यांनी स्पष्ट केले.

"एकही सचिव केडर ऑर्डरपासून वंचित राहणार नाही. संघटना प्रत्येक सचिवासोबत ठामपणे उभी आहे," असेही त्यांनी सांगितले.

काही गैरसमजातून चुकीचे संदेश पसरले असतील, मात्र संघटना ही प्रत्येक सचिवाच्या सुख-दुःखात सहभागी असल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक वर्षांनंतर सचिवांना दिलासा मिळण्याचा दिवस पाहायला मिळत असतानाच काही सहकाऱ्यांच्या ऑर्डर अद्याप प्रलंबित असल्याने, जोपर्यंत सर्व सचिवांच्या ऑर्डर निघत नाहीत, तोपर्यंत संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या ऑर्डर न घेण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले.



येत्या आठ दिवसांत सर्व सचिवांच्या ऑर्डर काढण्यासाठी सहकार विभागाकडे पुन्हा एकदा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला असून हा पाठपुरावा नक्कीच यशस्वी होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा उपनिबंधक मंगेशजी सुरवसे यांनी सुरुवातीपासूनच जिल्ह्यातील सचिवांचे प्रश्न मार्गी लागावेत व सहकार क्षेत्र टिकून राहावे यासाठी अहोरात्र सहकार्य केल्याचे रेवगडे यांनी सांगितले. "सचिवांचे हात बळकट झाले तरच सहकार मजबूत होईल," ही भूमिका सुरवसे यांनी कायम ठेवली असल्याचे त्यांनी नमूद केले.



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून


राज्यातील काही तांत्रिक त्रुटींमुळे ऑर्डर प्रलंबित राहिल्या असल्या, तरी त्या दूर करण्यासाठी राज्य सहकार सचिव विभागाकडे पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला असून लवकरच राज्य व जिल्ह्यातील सर्व सचिवांच्या ऑर्डर निघतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे दिवंगत माजी अध्यक्ष स्व. शिवाजीराव कर्डिले, विद्यमान अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील तसेच बँकेच्या सर्व संचालक मंडळाने या लढ्यात मोलाचे सहकार्य केल्याबद्दल रेवगडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

"आम्ही ग्रामीण भागातील सचिव असलो तरी सहकार बळकटीकरणासाठी ध्येयवादी भूमिकेतून लढत राहिलो. सहकार संस्था टिकल्या तर बळीराजा टिकेल," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

राज्याचे मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, शिक्षक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित दादा तांबे तसेच राज्यातील अनेक आमदार व मंत्री यांनी संघटनेचे हात बळकट केल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

"ही लढाई आपण ९९ टक्के जिंकली असून उरलेला एक टक्का देखील येत्या आठ दिवसांत पूर्ण होईल. राज्यातील सर्व सचिवांना हक्काची नोकरी पक्की करण्यामध्ये संघटनेला यश आले आहे," असे रेवगडे यांनी सांगितले. संघटनेने कधीही गैरव्यवहार केलेला नाही, ही संघटना सभासदांच्या सुख-दुःखासाठी उभी राहण्यासाठीच निर्माण झाली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेवटी, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री पंकज भोईर, सहकार आयुक्त तसेच अधिकारी वर्गाच्या सहकार्यामुळे हा लढा यशस्वी झाल्याचे सांगत, संघटनेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी व संचालक मंडळाचे त्यांनी अभिनंदन केले. ही संघटना भविष्यातही राज्यातील सचिवांच्या न्यायासाठी आणि सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी सदैव उभी राहील, असा विश्वास त्यांनी दैनिक समर्थ गांवकरीशी बोलताना व्यक्त केला.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा 'जनसेवक सन्मान' सोहळा थाटात संपन्न!





**मूल : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या चंद्रपूर जिल्हा शाखेतर्फे मूल येथील माँ. दुर्गा माता सभागृहात आयोजित करण्यात आलेला 'जनसेवक सन्मान सोहळा २०२६' तसेच प्रा. महेश पानसे यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात व गौरवपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष व ज्येष्ठ संपादक निलेश सोमानी होते. प्रमुख अतिथी म्हणून मूल नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. एकताताई समर्थ, उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले, चंद्रपूर जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बंडू रामटेके, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. महेश पानसे, विदर्भ अध्यक्ष अनुपकुमार भार्गव, नागपूर जिल्हाध्यक्ष शेंडे यांची उपस्थिती होती.

उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा. महेश पानसे यांचा केक कापून वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील सर्व पत्रकार संघ पदाधिकाऱ्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी मूल नगर परिषदेतील नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शैक्षणिक, समाजकार्य व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'जनसेवक सन्मान', 'गुरुवर्य सन्मान' आणि 'दर्पणकार स्मृती सन्मान' प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संघटक रुपचंद धारणे यांनी केले. संचालन मुनिराज कुथे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार अॅड. राहील थोरात यांनी मानले.

या सोहळ्यास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'जनसेवक सन्मान' प्राप्त मान्यवर

सौ. एकताताई समर्थ – नगराध्यक्षा, मूल
सौ. नलिनीताई अडपवार – सभापती, न. प. मूल
सौ. ललिताताई फुलझेले – सभापती, न. प. मूल
सौ. समिक्षा कडस्कर – उपसभापती, न. प. मूल
श्री. मिलिंदजी खोब्रागडे – माजी सभापती, न. प. मूल
डॉ. तिरथ उराडे – वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, मूल
चंद्रशेखर अडगुनवार – माजी सैनिक
गजेंद्र रायपुरे – तहसील कार्यालय, मूल
'गुरुवर्य सन्मान'
अशोक झाडे सर – माजी प्राचार्य
अविनाश जगताप सर – मुख्याध्यापक, सुभाष विद्यालय, मूल
'दर्पणकार स्मृती सन्मान'
आशिष घुमे – संपादक
विजय सिद्धावार – संपादक
प्रविण बटकी – जिल्हा प्रतिनिधी, दै. महासागर
सुनील बोकडे – जिल्हा प्रतिनिधी, दै. लोकमत टाईम्स
मनिष रक्षमवार – जिल्हा प्रतिनिधी, NDTV
विनोद पन्नासे – मुख्य वितरक तथा संपादक
गिरीश नवघडे – पत्रकार

## अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्याची मागणी

- माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे आणि राहुल डंबाळे यांचे मुख्यमंत्री फडणवीस व महापालिका आयुक्तांना निवेदन



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते कै. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. राज्याच्या उभारणीत तसेच पुणे शहराच्या विकासात त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाच्या स्मरणार्थ पुणे शहरात त्यांचे भव्य स्मारक उभारावे, अशी मागणी माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे आणि रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, कै. अजितदादा पवार यांचे पुणे शहराशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते. पुणे शहराच्या उभारणीत त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिलेली असल्याने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन त्यांचे यथोचित स्मारक उभारणे आवश्यक आहे. संगमवाडी येथे पुणे महानगरपालिकेच्या नदी सुधार प्रकल्पांतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या संगमघाटावर कै. अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती भव्य पुतळा उभारावा तसेच त्यांच्या कार्याचा वारसा जपणारी शिल्पसृष्टी निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी चालू अर्थसंकल्पात किमान दहा कोटी रुपयांची प्राथमिक तरतूद करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या ठिकाणी उभारण्यात येणारे स्मारक हे पुणे शहरातील नागरिकांसाठी कै. अजितदादा पवार यांच्या आठवणी कायम ठेवणारे महत्त्वपूर्ण केंद्र ठरेल, असा विश्वास डॉ. सिद्धार्थ धेंडे आणि राहुल डंबाळे यांनी व्यक्त केला आहे.

## बँक खात्यामध्ये ४५०० रुपये जमा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

ई-केवायसीच्या प्रक्रियेमुळे थकलेला तीन महिन्यांचा ४५०० रुपयांचा हप्ता लाडक्या बहिणींना एकत्र मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाकडून देण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेने राज्यातील महिलांना थेट आर्थिक मदतीचा लाभ त्यांच्या बँक खात्यामध्ये दिला जात आहे. या योजनेअंतर्गत दरमहा १५०० रुपये मदत दिली जाते. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना ई-केवायसी न झाल्यानं अनेक महिलांचे हप्ते थांबले आहेत. काही पैसे जमा न झाल्याने महिलांनी थेट संबंधितांकडे जात आपली नाराजी आणि संताप व्यक्त केला होता, नाराज झालेल्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण करूनही त्यांच्या खात्यांमध्ये पैसे आलेले नव्हते. काही ठिकाणी महिला थेट रस्त्यावर उतरून आंदोलन करतानाही दिसून आल्या.

## थकबाकीदारांवर कडक कारवाईचे आदेश – सौरभ राव

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




ठाणे महापालिका हद्दीतील ज्या करदात्यांनी अद्यापपर्यंत आपला मालमत्ता कर भरलेला नाही अशा करदात्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले. मागील एक ते दोन महिन्यापासून मालमत्ता कर वसुली अपेक्षेपेक्षा कमी होत असल्याने नाराजी व्यक्त करत जे कर भरत नाही अशा निवासी मालमत्ताधारकांचे नळसंयोजन खंडीत करणे, कर न भरणाऱ्याअनिवासी मालमत्ता जप्ती करण्याच्या कडक सूचनाही आयुक्तांनी बैठकीत दिल्या. सन 2025-26 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी (दिनांक 03 फेब्रुवारी 2026) आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (२) श्री. प्रशांत रोडे, उपायुक्त श्री. जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त मिताली संचेती तसेच सहायक आयुक्त व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मागील एक ते दोन महिन्यांपासून मालमत्ता कराची वसुली अपेक्षेपेक्षा कमी होत असल्याने आयुक्तांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. ज्या करदात्यांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांच्यावर तात्काळ जप्ती, वॉरंट बजावणे, नळ संयोजन खंडीत करुन, पाणीपुरवठा बंद करणे नळजोडणी व इतर सेवा खंडित करण्याचे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. अनिवासी मालमत्तांबाबत विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून १० फेब्रुवारीपर्यंत ही मोहिम सुरू राहणार आहे. या मोहिमेत अनिवासी मालमत्ताधारकांवर जप्ती व सील करण्याची कडक कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी सर्व सहायक आयुक्त व परिमंडळ उपायुक्तांना दिले आहेत. तसेच, कर वसुली वाढविण्यासाठी विविध ठिकाणी मोठ्या गृहसंकुलांमध्ये विशेष शिबिर आयोजित करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

## पडघे गावाच्या मुख्य वळणावर पथदिव्यांचा अभाव

- अपघाताचा धोका वाढला
- लोकधारा प्रतिष्ठानकडून तातडीने पथदिवे बसविण्याची मागणी



**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघे गावाच्या मुख्य वळणावर अद्यापही पथदिव्यांची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील पडघा टोल नाक्यापासून अवघ्या १०० ते १५० मीटर अंतरावर असलेल्या पडघे गावाच्या मुख्य वळणावर, बिकानेर दुकानासमोर तसेच नाशिककडून येताना शेरेकर पाडा मार्गे पडघे गावात प्रवेश करताना रात्रीच्या वेळी प्रचंड अंधार पसरलेला असतो. या मार्गावरून नाशिक–भिवंडी दरम्यान मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी तसेच जड वाहने सातत्याने ये-जा करत असतात. महामार्गावरून अचानक पडघे गावाकडे वळण घेताना योग्य प्रकाशव्यवस्था नसल्यामुळे वाहनचालकांना वळणाचा अंदाज येत नाही. परिणामी अपघात होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली असून स्थानिक नागरिक, पादचारी, विद्यार्थी तसेच रात्री कामावरून घरी परतणारे कामगार यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाला अनेक वर्षे उलटून गेली असतानाही या महत्त्वाच्या वळणांवर अद्याप पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नाही, ही बाब आश्चर्यकारक आणि चिंताजनक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एवढ्या वर्दळीच्या ठिकाणी पथदिवे नसणे म्हणजे अपघाताला आमंत्रण देण्यासारखे असल्याची तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. ही गंभीर बाब लक्षात घेऊन लोकधारा प्रतिष्ठानच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेसाठी पुढाकार घेण्यात आला आहे.


अपघात होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पडघा टोल नाक्यापासून सुमारे १०० ते २०० मीटर परिसरातील दोन्ही बाजूंच्या पडघे मुख्य वळणांवर तातडीने पथदिवे बसवावेत, अशी ठाम मागणी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महामार्ग क्रमांक ३ चे प्रकल्प संचालक यांच्याकडे ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन सादर करून सदर ठिकाणी त्वरित प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. पथदिवे बसविल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊन नागरिकांना सुरक्षित प्रवास करता येईल, अशी अपेक्षा स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## पोषण आहार वाहतूक व्यावसायिकाकडे खंडणीची मागणी

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

शालेय पोषण योजनेअंतर्गत काम करणाऱ्या शालेय पोषण आहार वाहतूक व्यावसायिकाकडून खंडणी उकळण्याच्या उद्देशाने तत्कालीन सुपरवायझरने साथीदारांसह गोडावूनवर हल्ला करून वाहने फोडल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी दत्ता सोनवणे (रा. कल्याण रस्ता, नालेगाव) याच्यासह त्याच्या पाच ते सहा अनोळखी साथीदारांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात खंडणी व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सागर पाटील (रा. नवनागापूर) यांनी सोमवारी (२ फेब्रुवारी) फिर्याद दिली आहे. फिर्यादी पाटील हे केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री शालेय पोषण योजनेअंतर्गत जिल्ह्यातील शाळांना पोषण आहार पुरवठा करतात.

## एकाची आत्महत्या तर दुसऱ्या घटनेत पत्नीची हत्या



### दिवा पोलीस स्टेशन तात्काळ सुरु करण्याची मागणी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिव्यात बेडेकर नगर येथे खरवलीआई चाळ येथे सुशांत यादव (वय 39) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. यादव यांनी अज्ञात कारणातून राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. घरात कोणीही नसल्याची संधी साधत सुशांत यादव यांनी सिलिंग फॅनला ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. सुशांत विवाहित असून ते एका राजकीय पक्षात सक्रिय कार्यकर्ते होते. दरम्यान काल संध्याकाळच्या सुमारास पत्नी घरी आली असता त्याना सुशांत गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यांनी तातडीने याबाबत दिवा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा करुन उत्तरीय तपासणीसाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवला. यादव यांच्या पश्चात पत्नी, आई वडील, भाऊ असा परिवार आहे. तर दुसऱ्या घटनेत दिवा स्टेशन ते सदाशिव दळवीनगर रस्त्यावरील रुही अपार्टमेंट मध्ये दुसऱ्या मजल्यावर राहणारे पती पत्नी यांचे आपआपसात कौटुंबिक वादातून झालेल्या भांडणातून पतीने धारदार हत्याराने वार करून पत्नीची हत्या केली असून प्रकरणी आरोपी पतीला दिवा पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपासाचीचक्रे फिरविण्यात आली असून सदर हत्या प्रकरणी आज ठाणे फॉरनसिक टीम घटनास्थळी दाखल झाली असून पुढील तपास सुरु असून मृत महिलेला पुढील कारवाईसाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवले आहे. सदर महिला हत्या याप्रकरणी अधिक तपास मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक सोनावणे अधिक तपास करत आहेत. दिव्यात वाढती लोकसंख्या व वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर दिवा पोलीस स्टेशन तात्काळ सुरु करण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

## ओतूर शाळेत वाचनालय आणि लॅपटॉपचे वितरण



**ओतूर : (समर्थ गांवकरी)**

निसर्गराजा मित्र जिवांचे - पुणे या संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक एक ओतूर या शाळेत पुस्तक वाचनालयाची निर्मिती करण्यात आली आहे. याअंतर्गत लायब्ररीसाठी आवश्यक असणारे कपाट तसेच शेकडो पुस्तके शाळेला संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध झालेली आहेत. यासोबतच निसर्गराजा मित्र जिवांचे संस्थेच्या माध्यमातून आणि टॉम टॉम इंडिया प्रा. लि. या नेव्हिगेशन क्षेत्रात काम करत असलेल्या संस्थेच्या सहकार्याने डेल या प्रतिथयश कंपनीच्या एका लॅपटॉपचे देखील वितरण शाळेला करण्यात आले आहे. मंगळवार( दि.३)सकाळी दहा वाजता शाळेच्या मैदानावर हा कार्यक्रम संपन्न झाला असून निसर्गराजा मित्र जिवांचे - पुणे या संस्थेचे संस्थापकीय संचालक राहुल दामोदर घोलप यांच्या हस्ते वरील साहित्याचे वितरण शाळेला करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन डुंबरे,मुख्याधपिका सिमा डुंबरे मॅडम आणि शाळेतील शिक्षक, शिक्षिका आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# शहराच्या विकासासाठी कटिबद्ध राहु - धनंजय जाधव

### सकल माळी समाजाच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव व उद्योजक अमोल गाडे यांचा सत्कार



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील,आमदार संग्राम जगताप,माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपा,राष्ट्रवादी युतीने महानगरपालिकेच्या निवडणुकीत ५२ नगरसेवक निवडून आल्याने घवघवीत यश संपादन केले आहे.

पक्षाने उपमहापौर पदाची निवड करून सन्मान केला आहे. तसेच महापौर पदी ज्योतीताई गाडे यांची निवड करण्यात आली आहे.

सकल माळी समाजाने केलेला सत्कार हा माझा घरचा सत्कार आहे. सकल माळी समाजाच्या माध्यमातून नेहमीच समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात.समाजाच्या पाठिंबा आमच्या सोबत असल्याने आम्हाला नेहमीच सामाजिक काम करताना प्रोत्साहन मिळत असते.शहर विकासाला गती देऊन महानगरपालिकेच्या माध्यमातून शहर विकासासाठी कटिबद्ध राहू.असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

सकल माळी समाजाच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांची उपमहापौरपदी निवड तसेच महापौर पदी ज्योतीताई गाडे यांची निवड झाल्याबद्दल उद्योजक अमोल गाडे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे विश्वस्त प्रा.माणिक विधाते,डॉ. रणजीत सत्रे,विनोद पुंड,चंद्रकांत पुंड, कॅप्टन सुधीर पुंड,उद्योजक संजय गारुडकर,डॉ.केतन गोरे,कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे,अमोल भांबरकर, माजी नगरसेवक सुरेश आंबेकर,वधुवर सुचक केंद्राचे रमेश चिपाडे,भास्कर चौधरी, मच्छिंद्र बनकर,अशोक हिंगे, राहुल रासकर,सुरेश कावळे, बाळासाहेब गायकवाड,प्रकाश इवळे,अशोक आगरकर,संजय झोडगे, देविदास खामकर,रोहित पठारे,गणेश बनकर,मनोज भुजबळ,अँड.गाडेकर, सुधाकर कानडे,अँड.अशोक गायकवाड, प्रसाद कोके,रवींद्र विधाटे,विष्णू पाबळे,गणेश कोल्हे आदी उपस्थित होते.

प्रा.माणिक विधाते म्हणाले,धनंजय जाधव यांना माजी उपनगराध्यक्ष कृष्णा भाऊ जाधव यांचा वारसा लाभलेला आहे.सामाजिक प्रश्नांची त्यांना जाण असल्याने जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असतात. धनंजय जाधव अनुभवी नगरसेवक असल्याने उपमहापौरपदी त्यांची झालेली निवड ही योग्यच आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा नगरकरांना निश्चितच होईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र पडोळे यांनी केले.तर आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.या कार्यक्रमासाठी सकल माळी समाजाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जटायू तीर्थ क्षेत्र विकासासाठी अधिकाऱ्यांची पाहणी!

(समर्थ गांवकरी)



कुंभमेळ्या पुर्वी सर्वतीर्थ टाकेद येथिल जटायू तीर्थ क्षेत्र व परिसराचा विकास होणे साठी ग्रामपंचायत सर्वतिर्थ टाकेद व ट्रस्ट ने सुचविलेल्या विविध कामांचा आराखड्यात समावेश करून सदरची विकासात्मक कामे होणे कामी आज जि.प चे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गुंडे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, पाणी पुरवठा विभागाचे तायडे, गटविकास अधिकारी महेश वळवी, अतिरिक्त बीडी ओ गोड़े, प्रशासक तथा विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कराळे, ग्रामविकास अधिकारी विजय रासकर उपस्थित होते.

या वेळी आलेल्या अधिकारी टिमने सिंहस्थ कुंभमेळा संदर्भात तिर्थस्थळाची पहाणी करून कुंभमेळा निमित्त येणारे साधू, महंत, भाविक यांचे सुख सोयी संदर्भात स्थानिक पदाधिकारी यांचेशी संबधित अधिकारी यांनी चर्चा केल) येऊ घातलेल्या कुंभमेळ्या पुर्वी सर्वतीर्थ टाकेद या जटायू तीर्थ क्षेत्र व परिसराचा विकास होणे साठी ग्रामपंचायत सर्वतिर्थ टाकेद व ट्रस्ट ने सुचविलेल्या विविध कामांचे आराखड्यात समावेश करून अद्याप ही विकासात्मक कामे होणे कामी आज जि.प चे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गुंडे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, पाणी पुरवठा विभागाचे तायडे, गटविकास अधिकारी महेश वळवी, अतिरिक्त बीडी ओ गोड़े, प्रशासक तथा विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कराळे, ग्रामविकास अधिकारी रासकर उपस्थित होते. या वेळी आलेल्या अधिकारी टिमने सिंहस्थ कुंभमेळा संदर्भात तिर्थस्थळाची पहाणी करून कुंभमेळा निमित येणारे साधू, महंत, भाविक यांचे सुख सोयी संदर्भात स्थानिक पदाधिकारी यांचेशी चर्चा केली. या संदर्भात ग्रामपंचा ग्रामपंचायत व ट्रस्ट यांनी कोट्यावधी रुपयांची कामे सुचविली असून यामध्ये प्रामुख्याने श्रीराम मंदिराचा जिणोद्वार करणे, तिर्थक्षेत्री साधू महंत यांचे साठी होम हवन व साधना केंद बांधणे, 1500 मिटर भूमिगत गटार, वाहन तळास फेव्हर ब्लॉक,, प्रवाशांच्या सोयीसाठी बस निवारा, पोलिस चौकी, शौचालय व स्नान गृह, भोजनालय, काँक्रिटी करण, साधू महंता साठी 50 रुम, निवारा शेड, तिर्थ, मंदिर सुशोभिकरण, पाण्याची टाकी, जनरेटर, परिसरातील रस्ते, पाणपोई इत्यादि कामे सुचविली असून इत्यादि कामे सुचविली आहेत. या वेळी उपसरपंच रामचंद्र परदेशी, सामाजिक कार्यकर्ते रतन नाना बांबळे, ललित मडके,शहाबाज शेख, शांताराम भांगे, ट्रस्टचे अंबादास महाराज श्रीवास्तव,किशोर पवार, सागर दवंडे, लालमन नांगरे, ज्ञानेश्वर भवारी, सुभाष मेमाणे इत्यादि उपस्थित होते.कोट्यावधी रुपयांची कामे सुचविली असून यामध्ये प्रामुख्याने श्रीराम मंदिराचा जिणोद्वार करणे, तिर्यक्षेत्री साधू महंत यांचे साठी होम हवन व साधना केंद बांधणे, 1500 मिटर भूमिगत गटार, वाहन तळास फेव्हर ब्लॉक,, प्रवाशांच्या सोयीसाठी बस निवारा, पोलिस चौकी, शौचालय व स्नान गृह, भोजनालय, काँक्रिटीकरण, साधू महंता साठी 50 रुम, निवारा शेड, तिर्थ व मंदिराचे सुशोभिकरण, पाण्याची टाकी, जनरेटर, परिसरातील रस्ते, पाणपोई इत्यादि कामे सुचविली आहेत.

या वेळी उपसरपंच रामचंद्र परदेशी, सामाजिक कार्यकर्ते रतन नाना बांबळे, ललित मडके,शहाबाज शेख, शांताराम भांगे, ट्रस्टचे अंबादास महाराज श्रीवास्तव,ग्रामविकास अधिकारी विजय रासकर,किशोर पवार, सागर दवंडे, लालमन नांगरे, ज्ञानेश्वर भवारी, सुभाष मेमाणे इत्यादि उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या वतीने 'माती महोत्सव' साजरा; पर्यावरण जनजागृतीचा प्रभावी उपक्रम!



कल्याण : (समर्थ गांवकरी)

रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण, पर्यावरण दक्षता मंडळ आणि शारदा मंदिर हायस्कूल, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच 'माती महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कल्याण शहरातील लाल चौकी येथील शारदा मंदिर हायस्कूलच्या सभागृहात हा उपक्रम पार पडला. "जागृती पर्यावरणाची, जाणून घेऊया माहिती मातीची" या ब्रीदवाक्याखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाअंतर्गत पर्यावरण दक्षता मंडळाच्या माध्यमातून शारदा मंदिर हायस्कूलमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना माती परीक्षणाबाबत विशेष मार्गदर्शन देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी माती महोत्सवात उस्फूर्त सहभाग घेत विविध उपक्रमांद्वारे मातीचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे अध्यक्ष धीरेंद्र सिंह, प्रकल्प प्रमुख रमेश मोरे, तसेच शारदा मंदिर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये मातीचे महत्त्व अधोरेखित व्हावे, पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात आल्याचे रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या वतीने सांगण्यात आले. या महोत्सवाला शारदा मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष विजय शिंदे सर, तसेच रोटरीयन कैलास, सुखदा मॅडम, पंकजकुमार चौधरी यांनी सदिच्छा भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने असा उपक्रम प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# वनकर्मचाऱ्याच्या हत्येनंतर वनविभाग–पोलीसांची मोठी कारवाई



डांग : (समर्थ गांवकरी)

दक्षिण डांग वनविभागाचे डी.सी.एफ. नीरजकुमार तसेच डांग जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे मोठी कारवाई केली आहे. दिनांक 31/01/2026 रोजी चिचीनागांवठा रेंज अंतर्गत बोरिगांवठा गावात लाकूड तस्करीदरम्यान एका वनकर्मचाऱ्याची निर्घृण हत्या झाल्याची गंभीर घटना घडल्यानंतर प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले होते.

नायब वनसंरक्षक (दक्षिण डांग, आहवा) यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक, बोटॅनिकल गार्डनचे अधीक्षक, नायब पोलीस अधीक्षक व वघई पोलीस निरीक्षक (PI) यांच्या नेतृत्वाखाली वनविभाग व पोलीस दलाची संयुक्त मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत तब्बल 120 वनकर्मचारी आणि 56 पोलीस जवानांचा मोठा ताफा सहभागी झाला होता.

कोशीमपातळ आणि घोधलपाडा या गावांमध्ये घराघरात तसेच आजूबाजूच्या परिसरात सखोल झडती घेण्यात आली. या तपासादरम्यान कोणतीही परवानगी न घेता अवैधरित्या साठवून ठेवलेला मोठ्या प्रमाणावर लाकडाचा साठा आढळून आला.

झडतीदरम्यान अंदाजे 7 लाख रुपये किमतीचे 92 नग (7.575 घनमीटर) जुने सागवान लाकूड, तसेच 30 हजार रुपये किमतीचे 7 नग इतर लाकूड जप्त करण्यात आले. याशिवाय लाकूड कापण्याचे मशीन – 1, रंधा मशीन – 1, कटर – 2 आणि सायकल – 1 अशी विविध साधनेही वनविभागाने ताब्यात घेतली आहेत. या कारवाईत एकूण अंदाजे 7 लाख 60 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधित प्रकरणी कायद्यानुसार पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे. वनकर्मचाऱ्याच्या हत्येनंतर लाकूड तस्करांविरोधात प्रशासनाने घेतलेली ही निर्णायक कारवाई मानली जात असून, यामुळे अवैध लाकूड तस्करी करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

# आठवडा उलटूनही मारेकरी मोकाटच

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील दाभड येथील ७५ वर्षीय वृद्ध महिलेच्या निर्घृण हत्येप्रकरणी पोलीस प्रशासनाच्या संथ कारभाराविरोधात आज जनक्षोभ उसळला. हत्येला आठवडा उलटूनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने संतप्त दाभड ग्रामस्थांनी तहसील कार्यालय आणि पोलीस ठाण्यावर धडक मोर्चा काढला. "आरोपीला तात्काळ अटक करा आणि फाशी द्या," अशा घोषणांनी आज अर्धापूर परिसर दणाणून गेला होता. गेल्या बुधवारी (दि. २८ जानेवारी) दाभड येथील रहिवासी पार्वतीबाई प्रतापराव सूर्यवंशी या नेहमीप्रमाणे सकाळी शेताकडे गेल्या होत्या. मात्र, त्या घरी परतल्याच नाहीत. नातेवाईकांनी शोध घेतला असता, दाभड शिवारातील एका विहिरीजवळ त्यांचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळला.

# आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये रंगला भव्य सांस्कृतिक कार्यक्रम

## दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात!

ठाणे : (समर्थ गांवकरी)

आदर्श इंग्लिश स्कूलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना व्यासपीठ मिळाले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या प्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती मीनाबेन जाधव, मुख्याध्यापिका श्रीमती लिडिया सालियन, श्री. जतिन प्रजापती, शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला संबोधित करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई ठक्कर म्हणाले की, "शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे. जे शिक्षण आपल्याला चांगला माणूस बनवते, समाजासाठी उपयुक्त ठरवते आणि जीवनात प्रगती करण्याची दिशा देते, तेच खरे शिक्षण आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून पालकांचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे."

तसेच त्यांनी शिक्षकांना उद्देशून सांगितले की, "तुमचे सहकार्य आणि विश्वास हीच विद्यार्थ्यांची खरी ताकद आहे. योग्य प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थी निश्चितच यशाची शिखरे गाठतील."

मुख्याध्यापिका श्रीमती मीनाबेन जाधव आपल्या मनोगतात म्हणाल्या, "नृत्य, संगीत, नाटक, कला अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांना त्यांच्या



सुप्त गुणांची ओळख होते व आत्मविश्वास विकसित होतो. आजचा हा मंच विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारा असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे."

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले. विशेषतः संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई ठक्कर यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# स्व. अजितदादांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

## 'कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली'

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर येथे स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि 'कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली' या भावनेतून खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे कृषी प्रदर्शन दि. १९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पारनेर बाजार समिती शेजारील मैदानावर भरविण्यात येणार आहे. खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत बुधवारी पारनेर येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.

या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामध्ये ट्रॅक्टर, आधुनिक शेती अवजारे, बी-बियाणे, रासायनिक, सेंद्रिय व जैविक खते, औषधे, ठिबक सिंचन, शेततळी, दूध काढणी यंत्रे, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधमाशी पालन, रोपवाटिका, पशुआहार आदी शेती व शेतीपूरक व्यवसायांशी संबंधित सर्व साहित्य व माहिती उपलब्ध होणार आहे. यासोबतच कांदा व ऊस पिकवाढीबाबत मार्गदर्शन तसेच नव्या ए.आय. तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात कृषी विद्यापीठ, जिल्हा व तालुका कृषी विभाग, आत्मा योजना तसेच विविध शासकीय बँकांचे माहितीपर स्टॉल्स असणार असून, शासकीय योजनांचा लाभ व तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी मिळणार आहे. प्रदर्शनाचे खास आकर्षण म्हणून जगातील एकमेव आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये



नोंद झालेली अवघी २ फूट ८ इंच उंचीची 'राधा' ही जगातील सर्वात बुटकी म्हैस पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहे.

महिलांसाठी गृहउपयोगी वस्तूंची दालने, लहान मुलांसाठी किड्स झोन तसेच सांगली, कोल्हापूर व कोकण भागातील प्रसिद्ध खाऊ गल्लीचे स्टॉल्सही या ठिकाणी असणार आहेत. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा लाभ पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर, श्रीगोंदा, शिरूर व जुन्नर तालुक्यातील शेतकरी बांधवांना होणार असून, सर्व शेतकरी, नवउद्योजक तरुण व महिलांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात प्रगतिशील आदर्श शेतकरी, आदर्श शिक्षक, आदर्श उद्योजक,सामाजिक कार्यकर्ते, आदर्श सरपंच, आदर्श दुधडेअरी, आदर्श सहकारी सोसायटी हे पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येणार आहेत. तर प्रदर्शनाला भेट देणाल्या शेतकरी बांधवांसाठी खास दर एक तासाला लकि ड्रॉ आयोजीत करणार आहोत.

# उपोषणाचा इशारा

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

संत रविदास महाराज यांची राज्यातील प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात यावी,असे स्पष्ट परिपत्रक जारी केले आहे.मात्र, अर्धापूर तालुक्यासह नांदेड जिल्ह्यातील अनेक शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये संत रविदास महाराज यांची जयंती साजरी न केल्याचे निदर्शनास आले आहे,असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार गंगाधर सोनटक्के यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर गंगाधर सोनटक्के यांनी जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले असून,ज्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये संत रविदास महाराज जयंती साजरी करण्यात आलेली नाही,त्या कार्यालयांतील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून तात्काळ कारवाई करण्यात यावी,अशी मागणी गंगाधर सोनटक्के यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर,मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्याकडे केली आहे.

# अजितदादा पवार यांचे स्केच रेखाटत जागवल्या आठवणी

पारनेर : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला स्व. अजित पवार यांची राज्यातील युवक आणि युवतींमध्ये सुद्धा प्रचंड क्रेझ होती. सोशल माध्यमातून युवक व युवतींनी अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या आठवणी जागृत केल्या.

पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या येथील माजी सरपंच संजीवनी आंधळे यांची कन्या आयटी इंजि. काजल राजाराम आंधळे या युवतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हुबेहूब असे पेन्सिलने स्केच बनवत त्यांच्या आठवणी जाग्या करण्याच्या प्रयत्न केला आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहत त्यांच्या आठवणींना स्मरण केले. कु. काजल आंधळे ही पुणे येथे आयटी कंपनीत



काम करत आहे. सर्वच क्षेत्रातील लोकांनी अजितदादा पवार यांना सोशल माध्यमातून श्रद्धांजली वाहिली कु. काजल आंधळे हिने अजित दादांचे पेन्सिलने स्केच रेखाटत श्रद्धांजली वाहिल्यामुळे युवक युवतींच्या मनावर त्यांच्या कार्याची किती मोठी छाप होती हे यातून दिसते. खऱ्या अर्थाने अजित पवार यांच्या रूपाने सर्व समावेशक नेतृत्व हरपल्याने प्रचंड हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अशी दुर्दैवी घटना घडायला नको होती. आयटी इंजिनियर काजल आंधळे या युवतीने सांगितले की अजितदादा हे खऱ्या अर्थाने नेहमीच राज्यातील युवक व युवतींच्या भविष्याचा विचार करून त्यांना आधुनिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असत पिंपरी चिंचवड पुणे या भागात त्यांनी मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या जगभरातून आणल्या व आयटी क्षेत्राला ओळख निर्माण करून दिली.

> अजितदादांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राचे हृदय विदीर्ण झाले आहे. युवक-युवतींचे लाडके नेते, विकासपुरुष, समावेशक नेतृत्व हरपले. त्यांनी पिंपरी-चिंचवड-पुण्यात आयटी क्रांती घडवली, रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण केल्या. काजल आंधळेसारख्या युवतीने रेखाटलेले स्केच त्यांच्या लोकप्रियतेचे जिवंत पुरावे आहेत. दादांचे कार्य अमर राहील.
>
> **- आमदार काशिनाथ दाते (पारनेर नगर विधानसभा)**

# अन्नदान हे सर्वात श्रेष्ठ दान - अविनाश भांगरे



एकदरे : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील महाकाळच्या पायथ्याशी असलेले एकदरे हे गाव येथे मोखाजी बाबा यात्रे निमित्ताने सालाबादप्रमाणे याहीवर्षी अविनाश भांगरे अन्नदाते यांच्या सर्व परिवाराच्या वतीने मोखाजी बाबा यात्रा उत्सव निमित्त आलेल्या सर्व भाविक भक्तांना अन्नदान म्हणून पाव भाजी चा स्टॉल लावण्यात आला यावेळी सर्व भाविकांनी नियमाचे पालन करून भाविकांनी या पावभाजीचा आस्वाद घेतला.इथून मागेही आम्ही दान करत आलो आणि इथून पुढे ही अशीच परंपरा चालु राहील असे यावेळी कुटुंबांनी सांगितले. मोखाजी बाबांवर आमची श्रद्धा आहे. आम्हाला आजपर्यंत काहीही कमी पडू दिले नाही असे यावेळी सांगण्यात आले.दान करणारे दाते या जगात भरपूर असतात.परंतु देवावर मनापासून श्रद्धा ठेऊन आम्ही आज पर्यंत दान करत आलो आहे.एक ते दोन हजार भाविकांनी या पावभाजीचा लाभ घेतला. यावेळी उपस्थित अविनाश भांगरे, डॉ.संदीप भांगरे,जयेश भांगरे,योगिता भांगरे,गुलाब भांगरे,आदित्य भांगरे,लक्ष्मण खतेले,नामदेव चौरे, यमुना भांगरे,प्रियंका भांगरे यावेळी उपस्थित होते.

# शैक्षणिक गुणवत्ता आणि निधीच्या विनियोगावर केंद्र सरकारची नजर

## राज्यातील १३ हजार शाळांचे होणार 'सोशल ऑडिट'

(समर्थ गांवकरी)

केंद्र सरकारतर्फे 'समग्र शिक्षा अभियाना'अंतर्गत सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना दरवर्षी मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जातो. इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करूनही सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत अपेक्षित सुधारणा होत नसल्याचे चित्र समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने आता शाळा आणि विद्यार्थ्यांचे 'सामाजिक सर्वेक्षण' (सोशल ऑडिट) करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करत राज्यातील १३ हजार शाळांमध्ये हे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

प्राथमिक शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या उपक्रमाअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर आणि श्रीगोंदा या दोन तालुक्यातील मिळून ७१२ शाळांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यात ज्या शाळांचे सर्वेक्षण केले जात आहे, त्या सर्व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आहेत. राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी हे सर्वेक्षण सत्र राबवले जात आहे. प्रत्येक जिल्ह्यातील एकूण शाळांपैकी २० टक्के शाळांची या तपासणीसाठी निवड करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणाचे काम अत्यंत बारकाईने केले जात आहे. यासाठी नेमण्यात आलेली विशेष पथके प्रत्यक्ष शाळेत जाऊन पाहणी करत आहेत. शाळेला मिळालेल्या निधीतून भौतिक सुविधा खरोखरच निर्माण केल्या गेल्या आहेत का, याची खातरजमा हे पथक करत आहे. तसेच, विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळाले आहे की नाही, याची माहिती थेट विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून घेतली जात आहे. या सामाजिक सर्वेक्षणादरम्यान जमा केलेली माहिती केंद्र सरकारने विकसित केलेल्या एका विशेष मोबाइल ॲपमध्ये नोंदवली जात आहे. एवढेच नव्हे तर, गोळा केलेली माहिती संबंधित शाळेच्या व्यवस्थापन समितीसमोर वाचून दाखवली जात आहे, जेणेकरून पारदर्शकता राहावी. तपासणी पूर्ण झालेल्या शाळांच्या संदर्भात लवकरच तालुका स्तरावर जनसुनावणी घेण्याचे नियोजन देखील करण्यात आले आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शता सोसायटी'सोबत सामंजस्य करार केला आहे. समग्र शिक्षण योजनेचा लाभ घेणाऱ्या राज्यातील एकूण ६५ हजार शाळांचे टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण केले जाणार आहे. सध्या पहिल्या टप्प्यात १३ हजार शाळांमध्ये हे काम सुरू आहे. नगर जिल्ह्याचा विचार करता, संगमनेर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ७१२ शाळांची निवड या प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे.

केंद्र सरकारकडून शाळांच्या दुरुस्तीसाठी, गणवेशांसाठी आणि पुस्तकांसाठी कोट्यवधींचा निधी दिला जातो. मात्र, अनेकदा हा निधी राज्यस्तरावरून जिल्हास्तरावर वेळेत पोहोचत नाही. जर राज्याने वेळेत निधी दिला, तर शिक्षण विभागाकडून तो खालच्या स्तरावर वितरित करण्यात विलंब होतो. याचा परिणाम असा होतो की, शाळा सुरू झाल्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश आणि पुस्तके मिळत नाहीत. काही वेळा दोन गणवेशांऐवजी केवळ एकच गणवेश मिळतो किंवा पुस्तके अपुरी पडतात. तरीही, सरकारी दप्तरी मात्र सर्व विद्यार्थ्यांना सर्व साहित्य मिळाल्याची नोंद केली जाते. शाळांच्या इमारती दुरुस्तीसाठी आणि नवीन बांधकामासाठी निधी देऊनही शाळांची अवस्था बिकट असल्याचे आढळून येते.

शाळांना आधुनिक सोयी-सुविधा आणि साहित्य पुरवूनही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ का होत नाही, ही बाब केंद्र सरकारच्या निदर्शनास आली आहे. एक प्रकारे हा निधीचा अपव्यय असल्याचे केंद्र सरकारचे मत बनले आहे. याच कारणामुळे त्यांनी शाळांचे सामाजिक अंकेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या माध्यमातून योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी आणि त्रुटी समजून घेतल्या जाणार आहेत. तसेच, या प्रक्रियेत अजून काही सुधारणांची आवश्यकता आहे का, यावर आधारित अहवाल केंद्र सरकारला सादर केला जाणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# अतिक्रमण हटल्याशिवाय विकास नाही

- जामखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा आंदोलनाचा इशारा
- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना दिले निवेदन



**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड नगरपरिषद हद्दीतील मलनिस्सारण प्रकल्प (टप्पा-१) अंतर्गत सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट, नियमबाह्य व संथ गतीने सुरू आहे. याबाबत तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना निवेदन देण्यात आले आहे.जामखेड शहरात सध्या नगरपरिषद हद्दीतील मलनिस्सारण प्रकल्प (टप्पा-१) अंतर्गत सुरू असलेली गटार व संबंधित सिव्हिल कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची, शासनमान्य अंदाजपत्रक व तांत्रिक निकषांचे सर्रास उल्लंघन करणारी व अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. सदर कामांमुळे जामखेड शहरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. सदर प्रकल्पासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर असताना प्रत्यक्षात मात्र दर्जाहीन व नियमबाह्य पद्धतीने कामे सुरू असल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचा संशय निर्माण होत आहे.या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून मंगळवार दि 3 फेब्रुवारी रोजी सकाळी तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना निवेदन दिले. आपल्या मागण्यान बाबत म्हंटले आहे की गटार चेंबर व चेंबरची साईज सिमेंट काँक्रीट करताना मंजूर अंदाज पत्रकातील मापदंड व तांत्रकनिकष पाळले जात नाहीत.




ठाणे, दिवा ता ४ फेब्रु : आज दिनांक ०४/०२/२०२६ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास आशापुरा मेडिकल मागे, खर्डी गाव, दिवा (पू.) ठाणे या ठिकाणी ओम बंगला (मालक - श्री.गणेश भोईर) मध्ये भारत गॅस सिलेंडरला आग लागली होती. सदर घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान ०१- फायर वाहन व १-रेस्क्यू वाहनासह तसेच टोरंट पॉवर कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. सदर घटनास्थळी आग लागल्याने किचनमधील साहित्य, फ्रिज, इलेक्ट्रिक वायरिंग, गॅस सिलेंडर इत्यादी जळून नुकसान झाले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### कंधारमध्ये दादांच्या अस्थी कलशाचे सर्वपक्षीयांनी घेतले दर्शन

कंधार (स. गांवकरी) : राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थी रथाचे शहरात आगमन होताच महाराणा प्रतापसिंह चौकात त्यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शेकडो जणांनी भावपूर्ण वातावरणात अस्थीचे दर्शन घेतले. रात्री मुखेड मार्गे अस्थी कलश यात्रा कंधारला पोहचली. यावेळी अमर रहे अमर रहे, अजितदादा अमर रहे, अश्या घोषणा देण्यात आल्या “अजित दादांच्या अस्थी घेऊन कंधार शहरात यावे लागेल, असे आम्हाला कधीच वाटले नव्हते. स्वप्नातही हा क्षण पाहिला नव्हता. मन दुभंगून टाकणारा हा प्रसंग"असल्याचे अनेकांनी भावना व्यक्त करीत महाराणाप्रताप चौकात दादांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी माजी आमदार गुरुनाथ कुरुडे, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार सुभाष साबणे, बाबुराव केंद्रे(उमरगेकर),प्रवीण पाटील चिखलीकर,शिवराज पाटील होटाळकर, उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी,ॲड.बी.के.पांचाळ, स्वप्निल पाटील लुंगारे, भगवान राठोड, जफरउल्ला खान,चेतन केंद्रे,सुधाकर कौंसल्ये, धनराज लुंगारे, किशन डफडे, ॲड. मारोती पंढरे,बालाजी डफडे,उत्तम चव्हाण, विनोद पाटील तोरणे, गंगाधर कांबळे, मधुकर पाटील डांगे, व्यंकट नागलवाड, शहाजी पाटील शिंदे, संदीप तोंडचिरे, प्रकाश घोरबांड, शेख फारुक, मन्नू सेठ, अंकुश कदम, श्यामसुंदर शिंदे, सुहास कांबळे, अनिता कदम, आसीफ शेख, राजकुमार केकाटे,राजहंस शहापुरे, बालाप्रसाद मानसपुरे, सुधाकर कांबळे, पिंटू कदम, दत्ता चंदनफुले, हब्बुभाई, दिलीप देशमुख यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

### पवार यांच्या अस्थिकलशाचे फुलवळ करांनी व कंधारकरांनी घेतले दर्शन

कंधार (स. गांवकरी) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा अस्थीकलश ता. ३ फेब्रुवारी रोज मंगळवारी मुखेड वरून कंधारकडे जात असतांना सायंकाळी ६:३० वाजता फुलवळ येथे तर कंधार येथे 7:00 वाजता दाखल झाला. दिवंगत अजित पवार यांचे अस्थीकलश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक फुलवळ , बहादरपुरा ,कंधार येथे दर्शन घेण्याकरिता ठेवण्यात आले होते. यावेळी अस्थिकलशाचे उपस्थितांनी दर्शन घेत असताना प्रत्येकाला अश्रू अनावर झाले होते. नागरिकांकडून अस्थिकलशाचे दर्शन घेत एक मिनिट स्तब्ध उभे राहून सामुदायिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अजितदादा अमर रहे , दादा परत या.. च्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी अस्थिकलश रथ यात्रेत माजी आमदार सुभाष साबणे , आ. मोहन अण्णा हंबर्डे , मा. आ. मधुकर घाटे , प्रवीण पाटील चिखलीकर , रावणगावकर सह अनेकांचा समावेश होता. कंधार व फुलवळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कार्यकर्त्यांकडून आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी चौक येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित सर्वांनी येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन केले त्यानंतर उपस्थितांनी एक मिनिटाची सामुदायिक आदरांजली अर्पण केली.

## अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामपंचायत तक्रारी २१ दिवसांत निकाली काढण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गावामधील रस्त्यांवरील अतिक्रमण, घराच्या-जागांच्या चुकीच्या नोंदी, शासनाच्या मोकळ्या जागा बळकावणे, अशा विविध प्रकारच्या तक्रारी आल्यास, आता त्याची ग्रामपंचायत गंभीरपणे दखल घेणार आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी २१ दिवसांत अशा तक्रारी निकाली काढण्याचे सक्त आदेश दिले असून, त्यासाठी नवी नियमावलीही जारी केली आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडे तक्रारींचा ओघ सुरू आहे. सीईओ भंडारी यांच्या मार्गदर्शनात ग्रामपंचायतीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी अनेक तक्रारींचे निवारण केले आहे. मात्र,



काही चौकशी अहवालातही त्रुटी आहेत. चौकशी अहवाल मुदतीत प्राप्त न होणे, तक्रार अर्जातील मुद्यांना सोडून चुकीचे अहवाल प्राप्त होणे, मूळ तक्रार अर्जातील मुद्यांवर मुद्देनिहाय, वस्तुनिष्ठ व स्वयंस्पष्ट अभिप्राय न देता मूळ मुद्दे सोडून अहवाल सादर करणे, विस्तार अधिकारी यांच्या चौकशी अहवालावर गट विकास अधिकारी यांनी अभिप्रायाशिवाय केवळ गटविकास अधिकारी यांच्या सहीचे मुखपत्र जोडून जिल्हा परिषदेकडे पाठवणे, तक्रारदार व जबाबदार यांना चौकशीच्या वेळी उपस्थित राहणेकामी नोटीस न देणे, त्यांचे जाबजबाब न नोंदविणे व कागदपत्र प्राप्त करुन घेणे न.. अशा प्रकारचा निष्काळजीपणा सीईओंच्या निदर्शनास आला आहे. ग्रामपंचायत पातळीवर तक्रार अर्ज प्राप्त होताच अर्जदारास पोहोच द्यावी, ग्रामपंचायत पातळीवर तक्रार अर्जांसाठी आवक जावक नोंदवही ठेवावी, ग्रामपंचायत अधिकाऱ्याने तक्रारीतील बाबींची छाननी व पडताळणी करावी, अर्जदाराने पंचायत समितीकडे अर्ज केल्यास पोहोच दिली जावी, संबंधितांना नोटीस बजावण्याच्या कार्यपध्दतीचे नियमानुसार अनुकरण करावे. त्याचप्रमाणे निर्णयाचे आदेश तारखेसह बजावण्यात यावेत. प्रत्यक्ष जागेवर जाऊन जाबजबाब घेणे व वस्तुस्थिती जाणून घेणे, ग्रामपंचायतीकडील संबंधित रेकॉर्ड, अभिलेख पाहणे, ग्रामपंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी अथवा चौकशी अधिकारी यांनी विशेषतः त्याच पातळीवर तक्रारींचे निराकरण होईल, असा प्रयत्न करावा.

गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील तक्रारीची चौकशी अन्य विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य अधिकारी यांच्यामार्फत करण्यासाठी या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करुन वेळ वाया घालवू नये, प्रसंगी सहायक गटविकास अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करावी, अन्यथा बीडीओंनी स्वतः चौकशी करावी.

## कंधारमध्ये दादांच्या अस्थी कलशाचे सर्वपक्षीयांनी घेतले दर्शन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थी रथाचे शहरात आगमन होताच महाराणा प्रतापसिंह चौकात त्यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शेकडो जणांनी भावपूर्ण वातावरणात अस्थीचे दर्शन घेतले. रात्री मुखेड मार्गे अस्थी कलश यात्रा कंधारला पोहचली. यावेळी अमर रहे अमर रहे, अजितदादा अमर रहे, अश्या घोषणा देण्यात आल्या “अजित दादांच्या अस्थी घेऊन कंधार शहरात यावे लागेल, असे आम्हाला कधीच वाटले नव्हते. स्वप्नातही हा क्षण पाहिला नव्हता. मन दुभंगून टाकणारा हा प्रसंग"असल्याचे अनेकांनी भावना व्यक्त करीत महाराणाप्रताप चौकात दादांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी माजी आमदार गुरुनाथ कुरुडे, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार सुभाष साबणे, बाबुराव केंद्रे(उमरगेकर),प्रवीण पाटील चिखलीकर,शिवराज पाटील होटाळकर, उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी,ॲड.बी.के.पांचाळ, स्वप्निल पाटील लुंगारे, भगवान राठोड, जफरउल्ला खान,चेतन केंद्रे,सुधाकर कौंसल्ये, धनराज लुंगारे, किशन डफडे, ॲड. मारोती पंढरे,बालाजी डफडे,उत्तम चव्हाण, विनोद पाटील तोरणे, गंगाधर कांबळे, मधुकर पाटील डांगे, व्यंकट नागलवाड, शहाजी पाटील शिंदे, संदीप तोंडचिरे, प्रकाश घोरबांड, शेख फारुक, मन्नू सेठ, अंकुश कदम, श्यामसुंदर शिंदे, सुहास कांबळे, अनिता कदम, आसीफ शेख, राजकुमार केकाटे,राजहंस शहापुरे, बालाप्रसाद मानसपुरे, सुधाकर कांबळे, पिंटू कदम, दत्ता चंदनफुले, हब्बुभाई, दिलीप देशमुख यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.



## शेतकरी कुटुंबाला २ लाखांची मदत!

**पारनेर/ता. : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६ शेतकरी कुटुंबांवर ओढावणाऱ्या अचानकच्या संकटात शासनाची मदत वेळेवर पोहोचली पाहिजे, या भूमिकेतून आमदार काशिनाथ दाते सर यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत निमगाव घाणा येथील रुपनर कुटुंबाला २ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. निमगाव घाणा, ता. नगर येथील शेतकरी स्व. मच्छिंद्र गंगाधर रुपनर यांचे दि. २८ मार्च २०२५ रोजी विजेच्या धक्क्याने दुर्दैवी निधन झाले होते. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते सर यांनी तातडीने संबंधित प्रकरणाचा पाठपुरावा करून शासनाकडून आर्थिक मदत मंजूर करून घेतली. महाराष्ट्र शासनाच्या योजनेनुसार मंजूर झालेली २,००,००० रुपये (अक्षरी रुपये दोन लाख) इतकी रक्कम संबंधित लाभार्थी कुटुंबास अदा करण्यात येणार असून, ही रक्कम थेट बँक खात्यात जमा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या मदतीमुळे संबंधित कुटुंबाला कठीण काळात दिलासा मिळाला असून, आमदार काशिनाथ दाते सर यांच्या तत्परतेमुळे शासनाच्या योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## सारडा महाविद्यालयाचे प्रा. संजय धोपावकर यांचा क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सेवापुर्ती निमित्त विशेष गौरव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यात २५ ते २७ शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू घडले आहेत.त्यापैकी सहा शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू क्रीडा शिक्षक प्रा.संजय धोपावकर यांनी घडविले आहेत.

एक छत्रपती पुरस्कार मिळविण्यासाठी खेळाडूला अनेक राष्ट्रीय स्पर्धेत पदके मिळवावी लागतात.तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी करावी लागते.असे सहा पुरस्कार ज्युदो खेळामध्ये त्यांनी घडविले आहेत. क्रीडाक्षेत्राची सेवा केल्याने कुठल्याही प्रकारचे उत्पन्न व नफा मिळत नाही.सेवाभावदृष्टी डोळ्यासमोर ठेवून श्री.धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.क्रीडा क्षेत्रात यशस्वी नागरिक घडविण्याचे काम क्रीडा शिक्षक करीत असतात.

अनेक राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू त्यांनी घडविले आहेत.त्याचाच परिपाक म्हणून एवढा मोठा परिवार श्री. धोपावकर यांनी जमविला आहे. क्रीडा क्षेत्रातील अहिल्यानगरचा



नावलौकिक महाराष्ट्रात उंचावला आहे.यामध्ये क्रीडा शिक्षक प्रा. संजय धोपवकर यांचा सिंहाचा वाटा आहे.असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात वरिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक क्रीडा संचालक प्रा.संजय धोपावकर यांच्या सेवापूर्ती समारंभ निमित्त महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन प्राचार्या माहेश्वरी गावित यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, सौ.पद्मजा धोपावकर, धनंजय, विजय, अजय अमोल धोपावकर, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी,पर्यवेक्षक डॉ.राजु रिक्कल, एम. आर. कुलकर्णी, डॉ.कुमावत, डॉ.महेश मुळे,किशोर गांधी, अँड. शेलोत, प्रा.जोशी सर, प्रा. दिलीप कर्डिले, संतोष वाबळे मार्गदर्शक,अहिल्यानगर जिल्हा ऑलिंपिक असोसिएशनचे सचिव शैलेश गवळी,सर्व प्राध्यापक वृंद व प्राध्यापकेतर कर्मचारी,प्रा.संजय धोपावकर यांचा मित्रपरिवार व नातेवाईक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या,क्रीडा शिक्षक संजय धोपावकर यांचे क्रीडा क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे कार्य उत्कृष्ट असल्याने तीन वेळा नॅकचा "अ" दर्जा मिळाला.नॅकच्या प्रक्रियेत क्रीडा विभागच दाखवावा लागला. या क्रीडा विभागाचे नेतृत्व क्रीडा शिक्षक प्रा.संजय धोपावकर यांनी केले आहे.माजी प्राचार्य अनिल सहस्रबुद्धे यांच्या कार्यकाळात पुणे विद्यापीठात निर्भय कन्या अभियान नव्याने हा उपक्रम राबवायचा होता. या उपक्रमाची मांडणी श्री. धोपावकर यांनी केली होती.

या उपक्रमा मुळे सारडा महाविद्यालयातील मुली मोठ्या प्रमाणात खेळात सहभागी झाले आहेत.निर्भय कन्या हा उपक्रम आजही सरडा महाविद्यालयात सुरू आहे.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचा संयुक्त उद्घाटन समारंभ

### “संशोधनातूनच शाश्वत विकास आणि औद्योगिक प्रगती साध्य होईल”–मंगेश कुलकर्णी

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

येथील विळद घाट मधील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभागाच्या वतीने मटेरियल सायन्स तसेच एनर्जी अँड एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंग या विषयांवरील दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदांचा संयुक्त उद्घाटन समारंभ महाविद्यालयात उत्साहात संपन्न झाला. यंत्र अभियांत्रिकी विभाग, टेक्नॉलॉजी रिसर्च अँड इनोव्हेशन सेंटर, अकॅडमी ऑफ नॅनोटेक्नॉलॉजी अँड वेस्ट वॉटर इनोव्हेशन, जोहान्सबर्ग (दक्षिण आफ्रिका) तसेच कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोवेनंट युनिव्हर्सिटी, ओटा (नायजेरिया) यांच्या संयुक्त विद्यमाने मटेरियल सायन्स या विषयावरील सलग पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद आणि ऍडव्हान्सेस इन एनर्जी अँड एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंग या विषयावरील सलग दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या दोन्ही आंतरराष्ट्रीय परिषदा ऑनलाइन पद्धतीने पार पडल्या.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून व्ही.आर. डी.ई. अहिल्यानगरचे असोसिएट डायरेक्टर व सायंटिस्ट मंगेश कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात संशोधनाचे सामाजिक व औद्योगिक महत्त्व विशद केले. मटेरियल सायन्स, ऊर्जा आणि पर्यावरण अभियांत्रिकी या क्षेत्रात होत असलेले संशोधन देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी तसेच शाश्वत विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. स्वच्छ ऊर्जा, पर्यावरण संरक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी संशोधनाची गरज असून अशा आंतरराष्ट्रीय परिषदांमुळे विद्यार्थ्यांना व संशोधकांना जागतिक पातळीवरील संशोधनाची दिशा समजते,असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयीन स्तरावर अशा परिषदांचे आयोजन ही अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. या परिषदांमध्ये मटेरियल सायन्स, एनर्जी आणि एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंग या विषयात कार्यरत संशोधक, शास्त्रज्ञ व शैक्षणिक तज्ज्ञ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

परिषदेसाठी एकूण सुमारे २१२ शोधनिबंध प्राप्त झाले असून त्यापैकी निवडक ६९ शोधनिबंधांचे ११ सत्रांमधून



सादरीकरण करण्यात आले. हे शोधनिबंध भारतासह अल्बानिया, अल्जेरिया,पोलंड, रशिया,दक्षिण आफ्रिका, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, इंडोनेशिया, मलेशिया, मोरोक्को, फिलिपाईन्स, बांगलादेश, इजिप्त, म्यानमार, नेपाळ, नायजेरिया, ओमान अशा एकूण २१ देशांमधील नामांकित विद्यापीठे व संशोधन संस्थांकडून प्राप्त झाले होते. भारतातील नामांकित आयआयटी तसेच एनआयटी महाविद्यालयांचाही यात समावेश होता.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी की-नोट स्पीकर्स म्हणून डॉ.सर्जी गोरबोचेव्ह (चोंगकिंग युनिव्हर्सिटी, चीन),डॉ.संडे ओयेडेपो (मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग, कोवेनंट युनिव्हर्सिटी, नायजेरिया) तसेच प्रा.सुटेरीस कालोगिरू (युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, लिमासोल, सायप्रस) यांचे मार्गदर्शन लाभले.

उद्घाटनप्रसंगी जनरल सेक्रेटरी डॉ.पी.एम. गायकवाड, संचालक डॉ. अभिजीत दिवटे तांत्रिक संचालक प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.रविंद्र नवथर तसेच महाविद्यालयातील सर्व अभियांत्रिकी विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. तसेच ऑनलाइन पद्धतीने जगभरातील विविध विद्यापीठांमधील शैक्षणिक तज्ज्ञ सहभागी झाले होते. यामध्ये डॉ. संदीप काळे (डायरेक्टर, टेक्नॉलॉजी रिसर्च अँड इनोव्हेशन सेंटर, इंडिया) आणि डॉ.अजय मिश्रा (अकॅडमी ऑफ नॅनोटेक्नॉलॉजी अँड वेस्ट वॉटर इनोव्हेशन्स, जोहान्सबर्ग) यांचा समावेश होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# शाळा बांधकामात घोटाळा

- शाळेच्या इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने, पालकांमध्ये भीतीचे वातावरण



**डांग : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील बर्म्यावड गावातील शिक्षणाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळेच्या नवीन इमारत व कंपाउंड वॉलच्या बांधकामात गंभीर निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचाराचे आरोप समोर आले आहेत. कोट्यवधी रुपयांच्या खर्चातून उभारल्या जात असलेल्या या शाळेच्या इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे उघड झाल्याने ग्रामस्थ व पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या माहितीनुसार, शाळेचा पहिला स्लॅब इतका कमकुवत आहे की तो कोणत्याही क्षणी पत्त्यांच्या घरासारखा कोसळण्याची भीती आहे. स्लॅबच्या बीममध्ये सध्या मोठ्या प्रमाणात तडे गेलेले दिसून येत असून, त्यामुळे संपूर्ण इमारतीच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बांधकामातील पोकळपणा तेव्हा उघडकीस आला, जेव्हा ग्रामस्थांनी स्लॅबच्या बीमवर साध्या लोखंडी सळईने हलका प्रहार केला. या प्रहारातच बीमचा प्लास्टर निखळून खाली पडू लागला आणि आत वापरण्यात आलेले स्टील उघडे पडले. हे दृश्य पाहून पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निकृष्ट बांधकामामागे ठेकेदाराने कमी दर्जाच्या सिमेंटचा वापर केल्याचा तसेच वाळूऐवजी फक्त गिट्टी (ग्रीट) वापरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याशिवाय, कॉंक्रीटचे काम झाल्यानंतर आवश्यक असलेल्या क्युरिंग (पाण्याचा मारा) प्रक्रियेतही गंभीर दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे. स्लॅबमध्ये ओलावा येण्याच्या घटनेमुळे शासनाच्या निधीतून सुरू असलेल्या या प्रकल्पाच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या संपूर्ण प्रकरणात SSA (समग्र शिक्षा अभियान) विभागातील अभियंत्यांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला जात आहे. योग्य देखरेखीअभावी अभियंता व ठेकेदार यांच्यात संगनमत असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये जोर धरत आहे. जर या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले आणि भविष्यात एखादी दुर्घटना घडली, तर निरपराध विद्यार्थ्यांचे प्राण धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत, ग्रामस्थांनी तात्काळ या इमारतीचे लॅब टेस्टिंग करण्यात यावे, दोषी ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे आणि सदर धोकादायक बांधकाम पाडून नव्याने मजबूत व दर्जेदार शाळा उभारण्यात यावी, अशी ठाम मागणी केली आहे.

एच. बी. पटेल – उपजिल्हा विकास अधिकारी, डांग या संदर्भात डांग जिल्ह्याचे उपजिल्हा विकास अधिकारी एच. बी. पटेल यांनी सांगितले की, "बर्म्यावड येथील प्राथमिक शाळेच्या बांधकामात जर ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले असेल, तर ते अजिबात सहन केले जाणार नाही. आदिवासी मुलांच्या सुरक्षिततेशी खेळ करणाऱ्या कोणत्याही एजन्सीवर कठोर कारवाई करण्यात येईल. याप्रकरणी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत."

# स्मरणशक्तिची कसोटी म्हणजेच परिक्षा

- प्राचार्य डॉ.भाऊसाहेब देशमुख
- गुरुवर्य रा.वि.पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर राजूर विद्यालयात इ.१२वी विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ संपन्न.




**राजूर : (समर्थ गांवकरी)**

इयत्ता बारावीची परिक्षा सुरू होते. इथून पुढे खऱ्या अर्थाने जीवनाची कसोटी सुरू होते. त्यासाठी स्मरणशक्ती महत्त्वाची असते.कारण स्मरणशक्तीची कसोटी म्हणजेच परिक्षा असते. असे प्रतिपादन ॲड.एम.एन. देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भाऊसाहेब देशमुख यांनी केले.

राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे गुरूवर्य रा.वि.पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ संपन्न झाला.यावेळी प्राचार्य डॉ.भाऊसाहेब देशमुख हे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक एस.टी.येलमामे,प्राचार्य भाऊसाहेब बनकर,उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे,ग्रंथपाल साहेबराव घुले,अनिल आवारी यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.भाऊसाहेब देशमुख यांनी पुढे मार्गदर्शन करताना मोबाईलपासून दुर रहा.अभ्यासाची सवई लावा. नक्कीच फायदा होईल.जीवनात यश मिळवायचे असेल तर संघर्षाची तयारी ठेवा. सातत्याने कष्ट करा.नेहमी आनंदी रहा.सकारात्मक विचार ठेवा. असे विचार व्यक्त केले. संचालक एस.टी.येलमामे यांनी भविष्याचा वेध घ्या.पंखात बळ निर्माण करून देण्याचे काम विद्यालयाने केले आहे.त्यामुळे योग्य मार्गाने भरारी घ्या.आत्मविश्वासाने यश मिळवा. यशवंत,गुणवंत व किर्तिवंत व्हा.

# वेश्याव्यवसायाविरोधात संभाजी ब्रिगेडचे जनआंदोलन



**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा–पेडगाव रोड परिसरात सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाबाबत वारंवार प्रशासनाकडे निवेदने सादर करूनही हा अवैध व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. तालुक्यातील काही मोठ्या नेत्यांची नावे व छायाचित्रांचा गैरवापर करून चारचाकी वाहनांतून महिलांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण केली जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या अवैध व्यवसायाचा गंभीर परिणाम कापसे वस्ती, सोनवणे नगर, सावंत नगर, लोखंडे मळा व रसाळ वस्ती परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत असून, या ठिकाणी वेश्याव्यवसायासोबतच ड्रग्ज, गांजा तसेच विविध प्रकारच्या अमली पदार्थांचे इंजेक्शन खुलेआम मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, या रस्त्याने शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, हा मार्ग ऐतिहासिक श्रीगोंदा शहरात पेडगावकडून येणारा मुख्य रस्ता असून पेडगावला छत्रपती संभाजी महाराजांचा ऐतिहासिक वारसा आहे. अशा पवित्र व ऐतिहासिक परिसरात अवैध व्यवसाय सुरू असल्याने संभाजी ब्रिगेडने यापूर्वी, २०२४ मध्ये प्रशासन व स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने या व्यवसायाविरोधात आंदोलन केले होते. त्यानंतर कायदेशीर कारवाईही करण्यात आली होती. मात्र, संबंधित आरोपी जामिनावर सुटल्यानंतर पुन्हा तोच व्यवसाय जोमाने सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संभाजी ब्रिगेडने यासंदर्भात वेळोवेळी प्रशासनाकडे निवेदने देऊन कारवाईची मागणी केली.

# मातीच्या लोट्याचा कार्यक्रम संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

श्री महालक्ष्मी महिला ग्रुप व श्रीमती धनलक्ष्मी महिला चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने श्री रांदळ माताजीच्या लोटय़ाच्या कार्यक्रमात भाविकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

श्री महालक्ष्मी महिला ग्रुप व श्री धनलक्ष्मी महिला चॅरिटेबल ट्रस्ट, जमनादास ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड आणि श्री संजयभाई माळी, स्नेहा केटर्स यांच्या सहकार्याने सामूहिकरित्या श्री रांदल माताजींच्या लोट्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी रांदळ मातेच्या भक्तांचा मेळावा झाला. श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, कथाकार पू. जिग्नेश महाराज जोशी, श्री राजेंद्र पुराणिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# अजितदादांच्या विकासदृष्टीचे अंतिम फलित

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



मंगळवार दि. ३ फेब्रुवारी २०२६ पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाच्या विकासात्मक वाटचालीत स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान नेहमीच मार्गदर्शक ठरले आहे. त्यांच्या लोककल्याणकारी दृष्टीकोनातून व पारनेरवरील अपार प्रेमातूनच बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत पारनेर नगरपंचायतीस १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

यावेळी बोलताना आमदार दातेसर यांनी सांगितले की, या निधीतून पारनेर शहरातील मराठी शाळांची गुणवत्ता वाढविणे, महिला आरोग्य व सर्वसाधारण आरोग्य सुविधा बळकट करणे, पर्यावरण संवर्धन, नागरी स्वच्छता तसेच पर्यटन विकास यांसारख्या लोकाभिमुख कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या निधीच्या माध्यमातून पारनेर शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम होतील, विकासकामांना गती मिळेल आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंसह स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या लोककल्याणकारी विचारांना प्रत्यक्षात आणण्यास मोठी मदत होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने अधिकृत शासन निर्णय जारी केला असून, हा निधी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या अभियानांतर्गत मंजूर करण्यात आला असून सबंधित निधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांसह महायुती सरकारमधील सर्व सहकाऱ्यांचे अनमोल सहकार्य लाभले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना आमदार दाते सर म्हणाले की, "पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. स्वर्गीय अजितदादा पवार साहेबांनी त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यापर्यंत पारनेरच्या विकासाची काळजी घेतली. नगरपंचायतीसाठी यापूर्वी सुमारे १८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

"नगरपंचायतीस आलेला निधीचा उपयोग पारनेरच्या नागरिकांना प्रत्यक्ष लाभ होईल, अशाच लोकाभिमुख व विकासाभिमुख कामांसाठी केला जाणार असून या नव्या निधीमुळे पारनेर शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम होतील, विकासकामांना गती मिळेल तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या लोककल्याणकारी विचारांना प्रत्यक्षात आणण्यास मदत होईल,
**- आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

# शिर्डीत भाविकांची अडवणूक करणाऱ्या एजंटांवर प्रतिबंधात्मक कारवाई

## उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी जारी केले आदेश




**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

साईबाबा समाधी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची पिळवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानातूनच पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या व खासगी पार्किंगचा आग्रह धरणाऱ्या एजंटांवर आता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १५२ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचे सशर्त आदेश शिर्डी विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर यांनी निर्गमित केले आहेत.


शिर्डीत दररोज देश-विदेशातून लाखो साईभक्त दर्शनासाठी येतात. मात्र, मंदिर परिसर व शिर्डी शहरात अनेक ठिकाणी खासगी व्यक्तींकडून सार्वजनिक रस्त्यावर भाविकांची वाहने बेकायदेशीरपणे अडवली जातात. भाविकांना खासगी पार्किंगच्या ठिकाणी वाहने घेण्याचा आग्रह धरला जातो. तसेच विशिष्ट दुकानांतून अव्वाच्या सव्वा दरात पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जाते. यातून भाविकांची मोठी आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अनेकदा भाविकांना दमदाटी, शिवीगाळ व धक्काबुक्की करण्याचे प्रकारही घडले आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने हे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार शिर्डी गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे व प्रवेश मार्गावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाहने थांबवून त्यांची दिशाभूल करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही गावातून शिर्डी येथे येणाऱ्या प्रवाशांच्या वाहनांनी विशिष्ट दुकान अथवा आस्थापनेतूनच खरेदी करावी किंवा निवास करावा, असा आग्रह आता धरता येणार नाही. कोणत्याही व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली मध्यस्थीचे व्यवहार करणाऱ्यांवरही निर्बंध लादण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपली बाजू मांडता येईल, असे प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे.

# डॉ. स्वप्रिल रणदिवे यांना पितृशोक

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



कंधार येथील सुप्रसिद्ध डॉ.माधवराव बाबुराव रणदिवे यांचे वयाच्या 85 व्या वर्षी दिनांक 4 फेब्रुवारी पहाटे 2 च्या दरम्यान वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. ते प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.स्वप्रिल रणदिवे यांचे वडील होत. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दि.4 रोजी संध्याकाळी 4 वाजता स्मशानभूमी कंधार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,तीन मुली,सुन,नातू असा मोठा परिवार आहे. कंधार येथील भवानी नगर येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.स्वप्रिल रणदिवे यांचे वडील होतं. त्यांच्या अंत्यविधीला नातेवाइकांसह सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय,राजकीय क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.

# सैनिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



संस्कार शिक्षण संस्था संचलित सैनिक स्कूल, देवदैठण येथे मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून कर्नल सचिन रंदाळे (शौर्य चक्र, सेना मेडल – निवृत्त) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्नल साहेबराव शेळके होते.

यावेळी अनिल बनकर, उपसरपंच तुषार वाघमारे, सर्जेराव कौठाळे, माजी सैनिक सुभाष वाळुंज, पत्रकार रामदास कोळपे, दीपक करंजुले तसेच सतीश वाघमारे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

सायंकाळी ६ वाजता दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर स्वागतगीत, अतिथी सत्कार व मान्यवरांची भाषणे झाली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कौठाळे यांनी प्रास्ताविक केले, तर संस्थेचे विश्वस्त लक्ष्मण शिंदे सर यांनी मान्यवर व पालकांचे स्वागत केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुणे कर्नल सचिन रंदाळे व अध्यक्ष कर्नल साहेबराव शेळके यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना शिस्त, देशभक्ती व परिश्रमाचे महत्त्व विशद केले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणपती वंदना, छावा, भांगडा, तांडव नृत्य, पोतराज, नाट्य, कॉमेडी व ड्रामा यांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पालकांनी बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाचे ऑनलाइन थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. त्यामुळे बाहेरगावी असलेल्या अनेकांनीही या स्नेहसंमेलनाचा आनंद घेतला. सैन्यात कार्यरत सुभेदार मेजर संतोष चंदर भाटे यांनी ऑनलाइन कार्यक्रम पाहून कौतुक करत १,१११ रुपयांचे पारितोषिक ऑनलाइन स्वरूपात पाठविले.

# गुरु रविदास महाराज जयंतीनिमित्त खिचडी वाटप



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रसंत संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त इतवारा केळी मार्केट येथे अभिवादन करण्यात आले. आज दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी माघ पौर्णिमेला क्रांतीकारी महामानव विज्ञानवादी विचारवंत जगद्गुरु गुरु रविदास महाराज यांची ६४e वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे . त्या अनुषंगाने इतवारा भागात केळी मार्केट येथे गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेस महाआरती करुन अभिवादन करण्यात आले. धडके मित्रपरिवार व अनमोल शुज मेकर सर्व कारागिर यांच्या संयुक्त विद्यमाने संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त खिचडी वाटप यावेळी उपस्थित प्रभागातील नगरसेवक व मान्यवरांच्या उपस्थित अभिषेक सौद,दिपकसिंह रावत, बजरंगसिंह ठाकुर,सुंदरलाल शुरुखुदे, तुलजेश यादव,बाबुभाई खोकेवाले,अजिजभाई खुरेशी, इमरान खान,प्रितम जोंधने, अरुण भारती क्रायक्रमाचे आयेजक शंकर धडके,विश्वनाथ धडके बालाजी धडके,मधुकर घड़के संभाजी फुलपगार,राजू धडके,बंसी कुरील,अशोक सावरे,बेलेश्वर पाटेकर,बाळू हिवरे,गजानन जाधव, मारोतराव फुलपगार,मिलिंध जोंधळे मोठ्या प्रमाणात नागरिक समाजबांधव उपस्थीत होते.

# गटविकास अधिकारी एस. एम. ढवळे यांच्या नेतृत्वाखाली बाऱ्हाळी घरकुल मोहिमेला वेग

## पंतप्रधान आवास योजनेतील टप्पा क्रमांक दोन घरकुलांचे उत्साहात भूमिपूजन

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**



ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू कुटुंबांना हक्काचे पक्के घर मिळावे, या उद्देशाने केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत बाऱ्हाळी सर्कलमध्ये टप्पा क्रमांक दोन मधील घरकुलांचे भूमिपूजन मंगळवार दि. ३ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडले. या संपूर्ण मोहिमेचे प्रभावी नियोजन व काटेकोर अंमलबजावणी गटविकास अधिकारी एस. एम. ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बाऱ्हाळी, नेवळी व चव्हाणवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालय परिसरात पंतप्रधान आवास योजना विशेष मोहिमेअंतर्गत लाभार्थ्यांच्या घरकुलांच्या उभारणीस अधिकृत सुरुवात करण्यात आली. यामुळे अनेक वर्षांपासून कच्च्या घरात वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना सुरक्षित व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळणार आहे.

गटविकास अधिकारी एस. एम. ढवळे यांनी पदभार स्वीकारल्यापासून तालुक्यातील विविध विकासकामांना गती मिळाली असून, विशेषतः पंतप्रधान आवास योजनेच्या अंमलबजावणीत त्यांनी पारदर्शकता, गती आणि गुणवत्तेला प्राधान्य दिले आहे. प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत योजना पोहोचावी, कोणताही अन्याय होऊ नये, यासाठी त्यांनी सातत्याने ग्रामपंचायतींशी समन्वय ठेवून कामकाज केल्याचे दिसून येत आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी विस्तार अधिकारी धुळगंडे, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे अध्यक्ष सय्यद नजिर, एस. एस. पाटील, ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील, उपसरपंच व्यंकट वळगे, सचिन वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ, लाभार्थी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूमिपूजनप्रसंगी बोलताना गटविकास अधिकारी ढवळे यांनी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "घरकुलाचे बांधकाम वेळेत, दर्जेदार व नियमांनुसार पूर्ण झाले पाहिजे. शासनाच्या निधीचा योग्य वापर होणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे." तसेच लाभार्थ्यांना आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन व प्रशासनाकडून संपूर्ण सहकार्य दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील विकासात घरकुल योजना ही कणा ठरत असून, गटविकास अधिकारी ढवळे यांच्या कार्यक्षम नेतृत्वामुळे बाऱ्हाळी सर्कलमधील आवास योजना एक आदर्श मॉडेल म्हणून पुढे येत असल्याची भावना यावेळी उपस्थितांमध्ये व्यक्त करण्यात आली.

या उपक्रमामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळून लाभार्थ्यांच्या जीवनमानात निश्चितच सकारात्मक बदल घडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# विमान प्रवास आणि राहुल गांधींना आईचा सल्ला

## संपादकीय



संसदेच्या आवारात अगदी अल्पकाळ झालेली ती सहज बोलाचाली होती. पण तिला अर्थाचे अनेक पदर नंतर चिकटले. भाजपचे एक वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्र्यांशी बोलत असताना राहुल गांधी एकदम म्हणाले, 'माझ्या आईने मला खासगी विमानाने प्रवास टाळायला सांगितले आहे.' हे बोलून राहुल थांबले. वरकरणी हे सहज बोलणे वाटले. पण प्रत्यक्षात एका आईला वाटणाऱ्या काळजीपेक्षाही मोठा अर्थ त्यातून प्रकट झाला, हे मात्र नक्की. सोनिया गांधी यांनी दिलेला सल्ला हा पुत्रप्रेमापोटी होता. खासगी विमानांचे अपघात फारसे होत नसले तरी राजकारणात या अपघातांनी बरेच आघात केले आहेत. देशभरात गेल्या काही दशकांत अचानक झालेल्या विमान दुर्घटनांनी अनेक राजकीय नेत्यांना प्राण गमवावे लागले. देशाला ते मोठे धक्के होते. सोनिया गांधी यांना दीर्घ राजकीय अनुभव आहे. व्यक्तिगत आयुष्यात त्यांना खूप काही गमवावे लागले आहे; अशा पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या मुलाला दिलेला सल्ला हा जीवन आणि राजकारण एकमेकांना कसे छेद देते याची खोल जाण दर्शविणारा आहे. राहुल यांनी जाता जाता आईने दिलेला सल्ला बोलून दाखवला यातही पुष्कळ अर्थ होता. त्यातून त्यांच्यातला 'माणूस' दिसला. एरवी छोटे छोटे हिशेब करून लिहिल्या गेलेल्या संहिता राजकीय नेत्यांच्या बोलण्यातून सातत्याने डोकावत असतात. लोकभावनांच्या बाबतीत आपण किती जागरूक आहोत हे राहुल यांनी यातून दाखवून दिले. सध्या तुमच्या मनात काय आहे याबरोबरच 'काय दिसते?' यालाही महत्त्व आले आहे. खासगी विमानप्रवास टाळल्याने तुम्ही मूठभर अभिजनांपासून वेगळे आहात, संयमी आहात हे दिसते. यात कुठलीही नैतिक भूमिका घेणे नाही, टेंभा मिरवणे नाही. आपली आई काय म्हणते तेवढे मुलाने समोर ठेवले. नेते मोहिमा आखतात, मुद्द्यांचा खल करतात, त्यांची सतत धावपळ चालू असते; पण त्याचवेळी इतिहासात वेळोवेळी दिसून आलेले भय त्यांच्या मनात दडलेले असतेच. त्याबद्दल सहज बोलून जाण्यातून राहुल गांधी यांनी सार्वजनिक जीवनाच्या आत असलेला व्यक्तिगत भाग उघड



केला. घरात बोलली गेलेली एखादी गोष्ट संसदेच्या आसमंतात कान देऊन कशी ऐकली जाते, याचा हा एक विलक्षण नमुना! पश्चिम बंगालमधील राजकारणाला अनपेक्षितरीत्या बिहारी रंग चढू लागले असून, भाजप त्याचा आनंद घेताना दिसतो. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी निवडणुका होऊ घातलेल्या राज्यांचा व्यापक दौरा आखून आपली कारकीर्द सुरू करायचे ठरवले. पश्चिम बंगालपासून श्रीगणेशा होणार होता. केवळ बंगाल नव्हे तर त्याची पश्चिम बाजू, बिहार तसेच झारखंडच्या सीमेवरील बरद्वान आणि असनसोलची निवड त्यांनी केली. या टापूत हिंदी काही परकी भाषा नाही. त्यांनी भौगोलिकदृष्ट्या केलेली ही निवड हा योगायोग नव्हता. या जिल्ह्यांमध्ये बिहारी आणि बिगर बंगाली यांची संख्या लक्षणीय आहे. निवडणूक निकालांवर हा भाग आपोआपच निर्णायक परिणाम करीत असतो. शिवाय, या भागात राजकीयदृष्ट्या जागरूक असलेला कायस्थ समाज मोठ्या संख्येने असून, नितीन नबीन कायस्थच आहेत. भाजप कसे हिशेब करतो आहे हे लगेच दिसले.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ८०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 4 | | | 8 | | | 5 |
| | 2 | 8 | 7 | | 9 | | 4 | |
| 7 | | | 1 | | | 2 | 9 | 8 |
| | | | | 8 | | 1 | | |
| 4 | | | 2 | | 5 | | | 3 |
| | | 2 | | 7 | | | | |
| 2 | 5 | 1 | | | 7 | | | 9 |
| | 3 | | 4 | | 6 | 5 | 8 | |
| 8 | | | 5 | | | 3 | 1 | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 4 | 6 | 9 | 3 | 1 | 8 | 2 | 7 |
| 2 | 7 | 9 | 5 | 8 | 6 | 4 | 1 | 3 |
| 8 | 3 | 1 | 4 | 7 | 2 | 9 | 6 | 5 |
| 9 | 2 | 5 | 1 | 4 | 3 | 7 | 8 | 6 |
| 3 | 6 | 7 | 8 | 2 | 9 | 5 | 4 | 1 |
| 1 | 8 | 4 | 7 | 6 | 5 | 2 | 3 | 9 |
| 6 | 5 | 8 | 2 | 1 | 7 | 3 | 9 | 4 |
| 7 | 1 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 5 | 8 |
| 4 | 9 | 3 | 6 | 5 | 8 | 1 | 7 | 2 |

उत्तर उद्याच्या अंकात

**पंचांग**
५ फेब्रुवारी २०२५
गुरूवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
कृष्ण पक्ष
तिथि:चतुर्थी २४:२२:२९+
नक्षत्र:उत्तराफाल्गुनी

२२:५६:५७
योग:सुकर्मा
२४:०३:३७+
करण:बव १२:१०:३५
करण:बालव
२४:२२:२९+

## उपदेशाचे डोस

### संकल्पाची शक्ती

कर्नाटकामध्ये अगडी नावाचे गाव आहे. तेथे नारायण भगवान नावाचे मोठे साधू होऊन गेले. ते अखंड नामस्मरण करीत. हुच्चुराव नावाच्या खऱ्या साधकावर त्यांचे फार प्रेम होते. नारायण भगवान झोपेमध्ये घोरत असत. त्या घोरण्यामध्ये श्रीराम जयराम जय जय राम हा मंत्र स्पष्टपणे ऐकू येत असे. एकदा त्यांच्याकडे अर्धांगवायूचा झटका आलेला एक तरुण मुलगा त्याच्या आईने आणून सोडला. मुलगा म्हणाला, 'भगवान ! मी आपल्या पायाशी आलो आहे. आपण काय करायचे ते करा.' नारायण भगवानांनी विचारले, 'समजा तू बरा झालास तर?' मुलगा म्हणाला, 'मी जन्मभर तुमची सेवा करीन.' नारायण भगवान म्हणाले, 'बरं तर, उद्या सकाळी तू खाली जा. विहिरीचे पाणी काढ. मला स्नानाला पाणी लागते.' लोकांना हा विनोद वाटला. पण त्या मुलाने त्यांचे शब्द मनाशी घट्ट धरले. पहाटे चार वाजता तो जागा झाला. हुच्चुराव म्हणाला, 'मला खाली घेऊन चला आणि विहिरीच्या रहाटापाशी उभा करा.' तसे केल्यावर पहिल्या दिवशी त्या मुलाने कसे तरी दोन पोहरे पाणी काढले. पण चार दिवसांनी तो विहिरीपाशी जाऊन पाणी काढू लागला. त्याची ती प्रगती पाहून नारायण भगवान म्हणाले, 'माणसाच्या संकल्पात मोठे सामर्थ्य असते.' तो हुच्चुराव पुढे त्यांचा लाडका शिष्य बनला. नारायण भगवान एकीकडे एकटे निजत. फक्त त्याला त्यांच्या पायाशी झोपण्याची परवानगी होती.

कथा उपदेश : माणसाने संकल्प सोडावा. त्यासाठी प्रयत्न करावेत. यश मिळते.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६६३ - कॅनाडामध्ये भूकंप.
- १७८३ - कलाबरीयामध्ये भूकंप, ३०,००० ठार.
- १९६९ - अमेरिकेची लोकसंख्या २०० मिलीयनवर पोहोचली.
- १९८९ - करीम अब्दुल जब्बार ३८,००० पॉईंट बनविणारा पहिला एनबीए खेडाळू बनला.
- २००७ - जकार्तातील पुराच्या तडाख्यात २० जण ठार.
- २००७ - बगदादमधील गोळीबारात ३७ ठार.

### राष्ट्रीय

- २००८ - मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा टप्पा गाठणारा पहिला फलंदाज बनला.
- २००८ - मुंबईकरांना रेल्वे मंत्रालयाने नव्या वर्षाची भेट देतानाच दोन नव्या गाड्या मुंबई-जयपूर गरीब रथ व मुंबई-औरंगाबाद जनशताब्दी एक्सप्रेस सुरु केल्या.


### जन्म

- १९३७ - वर्ल्ड क्लास कौंटी चॅमपियन बेलजीयनचा गसटन रोएलंट्स याचा जन्म.
- १९४७ - गायक कलौड किंग याचा जन्म.
- १९७० - ऑस्ट्रेलियाचा क्रिकेटपटू डॅरेन लेहमन याचा जन्म.
- १९७६ - बॉलीवुड अभिनेता अभिषेक बच्चन याचा जन्म.

### निधन

- १९९७ - उद्योगपती जॉन रिचर्ड पेटरसन यांचे निधन.
- १९९७ - यूएसचा फ्रांसमधील राजदूत पमेला हरीमनचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ८०



**आडवे शब्द**

१. शुष्क, वाळलेला
४. मर्यादा, हद्द
६. दुधावरील घट्ट पापुद्रा
७. पंख
९. खळबळजनक
१२. मुलीचा नवरा
१३. डोंगराचा कोसळणारा भाग
१५. आरोळी, गर्जना
१६अ. तांदळाची मंद सुवासिक, लांब दाण्याची जात
१७अ. अगदी खरे!
१८. नामशेष
२०. गवत, कडबा इ.
२२. विठ्ठलपत्नी
२३. उजेड
२५. पुन्हा
२६. वहीत मोकळी सोडलेली जागा
२७. चलनवलन
२८. रेचक
२९. मोठा रस्ता
३०. आवाज, गोंगाट
३१. कापून ठेवलेले तुकडे
३३. विरोध, प्रतिकार करणारे
३४. पोलिसांच्या तावडीतून पळालेला
३६. वनराणी, जुन्या जमान्यातील एक नटीचे नाव
४१. झाकणाचे पात्र
४२. सोंगाड्या
४४. कमलनयन
४७. नरडे
४८. भोजनास योग्य असे
४९. मनातील अढी (ला.)
५०. वारा
५१. मैदान गाजवणारा खेळाडू
५३. अर्धी ओंजळ
५५. घात, वचक
५६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च
५८. मऊ
६०. नष्ट
६१. हे धरायला दिल्यास हात धरू नये!
६२. चषक
६३. बस्तान
६४. रणक्षेत्र
६६. सहायक
६८. तोफगाडी
६९. लोणी
७०. कांती, तेज

**उभे शब्द**

१. राग, क्रोध
२. मच्छर, ३. गंध
४. गावाचे प्रमुख
५. काढलेली सुट्टी
६. शिर्डीचे संत
७. माघारी येण्याचा रस्ता
८. विपत्तीची कहाणी
१०. टक, दृष्टी
११. घोड्याच्या खुराला लावण्याची लोखंडी पट्टी
१३. धमकी
१४. चढता स्वर
१६. शरीर
१७. सभा
१७अ. वाईट, सडलेले
१८. भरभराट
१९. रममाण
२१. ढीग
२३. प्रचार करणारा
२४. समुद्रातील एक छोटा प्राणी, शिंपला
२५. घागरा
२६. संतोष, आनंद
२७. नुकसान करणारे
२९. पाठीतील हाडांच्या मालिकेतील एक-एक
३२. 'कमीत कमी' या अर्थाचा शब्दप्रयोग
३३. पायंडा, पद्धत
३५. आदर्श राजवट (ला.)
३७. डोळे
३८. कागदपत्रांचा गठ्ठा
३९. दुसरे
४०. मैत्री, वितुष्ट संपणे
४२अ. मोहक, मनाला भावेल असे
४३. बांगड्यांचा व्यवसाय करणारा
४५. पद्म, कमल
४६. बुक्का, पण लगावण्याचा
४८. गोल गोल फिरणारा
५०. फुरसत
५२. हिंदीत अपयशी
५४. भेग, फट
५५. श्रीरामाचे वडील
५७. पातक
५८. पारख करणारी दृष्टी
५९. श्रीविष्णू, नवरा
६०. नाव
६२. वाळवी, उणीव
६४. एकटा
६५. बारावी रास
६६. अभिप्राय
६७. बारा वर्षांचा काळ

### शब्दकोडे क्र. ७९ चे उत्तर

**आडवे उत्तर :** १.करवंटी ३.मर्दन ५.कदम ९.कज्जा १०.दमादमाने १२.नयनबाण १५.संतापजनक १८.मात्रा १९.काम २०.हातोहात २१.डबा २३.सोनखत २४.मानव २६.रकाना २८.नापाक ३०.कान ३१.रसदार ३३.नसता ३५.कावकाव ३६.नवार ३७.नाट ३८.कलमा ३९.ताडन ४१.संवाद ४६.रया ४९.विद्या विनयेन शोभते ५३.त्रेधा ५५.कोर ५६.हिकमत ५८.सरसरीत ६०.माऊ ६१.सारी ६२.डफ ६३.सावधान ६५.चेक ६७.तरुणाई ६८.वारस ७०.अवसानघातकी ७३.बायको ७५.कर्ज ७६.रक्षा ७७.कडबा ७८.पसरट

**उभे उत्तर :** १.कर्दनकाळ २.वंदन ३.मज्जा ४.नरसंहार ५.कलप ६.मद ७.मद ८.सुनेत्रा ९.कण १०अ.माकड ११.मामा १३.यम १४.बावनकस १६.तात १७.जवान २०.हात २२.बारदान २३.सोपान २४.मानवता २५.वरदान २७.कारवाई २९.मुका मार ३०.काका ३२.जनावर ३४.ताकद ४०.डझन ४२.वार्ता ४३.विद्या ४४.मन ४५.आतेभाऊ ४७.यात्रेकरी ४८.सरस ४९.विश्वासघातकी ५०.विनित ५१.येणे ५२.शोक ५४.धम ५६.हिसाब ५७.तडकसार ५९.बांधा ६३.साईबाबा ६४.नवा ६५.चेव ६६.मघा ६९.सपाट ७०.अर्ज ७१.नक्षा ७२.तळी ७४.कोप

# सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवसीय शिबीराचे समारोप

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे महादेव पिंपळगाव येथे दि. २८ जानेवारी २०२६ ते ०३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सात दिवसीय शिबिराचा समारोप कार्यक्रम मंगळवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे होते. तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महादेव पिंपळगावच्या सरपंच वर्षा खंडागळे, ग्रामपंचायत सदस्य कपिल दुधमाल तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक आर. के. कदम यांनी सात दिवसांच्या शिबिरात स्वयंसेवकांनी राबवलेल्या विविध उपक्रमांचा सविस्तर लेखाजोखा अहवालाद्वारे सादर केला. या शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी गावातील मुख्य रस्त्यांची स्वच्छता करून प्लास्टिक संकलन, जलसंधारण, सेंद्रिय शेती व भूमी विकास, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, बालविवाह प्रतिबंध, अंधश्रद्धा निर्मूलन, रस्ता सुरक्षा, सायबर सुरक्षा तसेच मतदार जनजागृती असे विविध समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबवले. प्रमुख अतिथी डॉ. मारुती गायकवाड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाश्वत विकास व जलसंधारणाचे महत्त्व विशद करत स्वयंसेवकांना समाजाभिमुख कार्यासाठी प्रेरित केले. तसेच प्रा. डॉ. सूर्यकांत जाधव यांनी वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. सरपंच वर्षा खंडागळे आणि कपिल दुधमाल यांनी ग्रामस्थांच्या वतीने शिबिराबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विजय नवघरे यांनी गावकरी व विद्यार्थ्यांनी शिबिर यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले तसेच अशा शिबिरांमधून विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत जीवनमूल्ये रुजतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी स्वयंसेवक राम जाधव आणि ओंकार शिंदे यांनी शिबिरातील अनुभव कथन करून आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद रिजवान यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. के. कदम यांनी केले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. पल्लवी कांबळे, डॉ. प्रविण कारले, प्रा. मेघा गाजले, महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी, महादेव पिंपळगाव येथील सुजाण नागरिक तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# वरद मोबाईल शॉपी फोडून १.५ लक्ष रुपयाचा माल लंपास

- कंधार पोलिसात तीन अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटर येथील "वरद मोबाईल शॉपी अँड इलेक्ट्रॉनिक्स दुकान" फोडून चोरट्यांनी एक लक्ष पंचावन्न हजार रुपयांचा माल लंपास केला, सदरचे चोरटे हे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले असून, त्यांचा शोध घेत कंधार पोलीस ठाण्यात अज्ञात तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

दिनांक ४ फेब्रुवारी रोज बुधवारच्या पहाटे ३:०० ते ३:४० वाजताचे सुमारास अज्ञात ३ चोरट्यांनी आपला चेहरा दिसू नये.. या उद्देशाने तोंडाला स्कार्फ बांधून वरद मोबाईल शॉपी अँड इलेक्ट्रॉनिक्स दुकानाचे शटर तोडून रियलमी कंपनीचे ७ मोबाईल किंमत १ लक्ष ५ हजार, टेक्नो कंपनीचे २ मोबाईल किंमत ३० हजार रुपये, ज्येष्ठ प्रोसेस कंपनीचे पावर बँक १० नग किंमत १० हजार रुपये असा एकूण १ लक्ष ५५ हजार रुपयाचा माल घेऊन चोरटे फरार झाले आहेत. सदरचे तीनही चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले असून, सदरच्या चोरट्यांचा शोध कंधारच्या उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कंधार पोलीस असल्याचे बोलले जात आहे.

वरद मोबाईल शॉपी अँड इलेक्ट्रॉनिक्स दुकानाचे मालक अंकुश दत्तात्रय पेठकर रा. बहादरपुरा ता. कंधार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांचे आदेशान्वये गुरनं.३५/२०२६ कलम ३३१(४),३०५,३(५) बीएनएस प्रमाणे दाखल करून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्नेहा पिंपरखेडे या करत आहेत.

# कोर्टरूम ड्रामा 'अमर विश्वास'चा ट्रेलर प्रसिद्ध

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयर'ने आज सत्ता, गुन्हेगारी आणि न्यायाचे पदर असलेला, कथानकाला गहनता लाभलेला मनोरंजक कोर्टरूम ड्रामा 'अमर विश्वास' या आगामी ओरिजनल सिरीजच्या ट्रेलरचे अनावरण केले. रवी बहल, आमिर अली आणि बरखा बिष्ट यांच्यासमवेत राजीव खंडेलवालची मुख्य भूमिका असलेली ही मालिका उच्च-जोखमीच्या न्यायालयीन लढाईसाठी मंच तयार करते; जिथे सत्य हे दुर्लक्षित असते आणि न्यायाला मोठी किंमत मोजावी लागते. ट्रेलरची सुरुवात प्रभावशाली सिनेनिर्माते जेसू मोमीन यांच्या क्रूर हत्येपासून होते. ज्या प्रकरणाला प्रसारमाध्यमे त्वरित 'ओपन-अँड-शट' हे लेबल लावतात. लोकांच्या समजुतीनुसार आधीच दोषी ठरलेल्या बहार चक्रवर्ती या तरुणीवर लगेच संशय येतो. 'अमर विश्वास' हा या शर्यतीत उतरणारा एक हटके आणि चाणाक्ष वकील आहे. निव्वळ तथ्यं क्वचितच संपूर्ण कथेवर प्रकाश टाकतात हे त्याला पक्के ठाऊक आहे. अमर हा बहरचा बचाव करत असताना, तो शोषण, हेराफेरी आणि दीर्घकाळ दडवून ठेवलेल्या रहस्यांचे कंगोरे उघड करू लागतो. ज्यामुळे एक कट उघडा पडतो. जो सुरुवातीला दिसतो त्यापेक्षा अधिक खोल आणि गडद असतो. सुहास शिरवळकर यांच्या वाचक पसंतीस उतरलेल्या कादंबऱ्यांवर आधारित, 'अमर विश्वास' ही कलाकृती अर्जुन सिंह बरान आणि कार्तिक डी. निशांदार यांनी GSEAMS च्या बॅनरखाली तयार केला आहे. 'अमर विश्वास' मध्ये कोर्टरूम ड्रामाची तीव्रता आणि तपास गुन्ह्याची तीव्रता यांचे मिश्रण आहे. जसजसे प्रकरण समोर येते, तसतसे अमरला हा हेतू, साधने आणि संधी या कपटी त्रिकुटाला स्थापित करण्यासाठी काळाशी झुंज द्यावी लागते. त्याच्या स्वतःच्या माजी मेंटॉरसह कायदेशीर विचारांच्या विरोधात स्वतःला उभे करत असल्याचे जाणवते. प्रत्येक युक्तिवाद, उलटतपासणी आणि प्रकटीकरणासह, ही सिरीज 'सत्य शेवटी न्यायाकडे नेईल का?' हा एक अस्वस्थ करणारा प्रश्न उपस्थित करते.

# 'एकलव्य स्कूल'मध्ये प्रवेशासाठी १ मार्चला पूर्वपरीक्षा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे अंतर्गत सहा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही प्रक्रिया राबवली जात आहे. त्यानुसार अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे विभागांतर्गत असलेल्या सहा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील ५८३ रिक्त जागांसाठी १ मार्च, २०२६ रोजी प्रवेश पूर्वपरीक्षा होणार असल्याचे आदिवासी विकास कार्यालय, ठाणे येथील अपर आयुक्त गोपीचंद कदम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# गावातील शाळा आणि मंदिरे गावच्या संस्काराचे केंद्र

- जीवन शास्त्री बाबा कवी यांचे प्रतिपादन

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



जीवनात आनंद आणि सर्वार्थ समाधानी राहण्यासाठी आपले मन देवाला अर्पण करा. गावातील शाळा व मंदिरे गावाच्या संस्काराचे केंद्र असून अध्यात्मिक प्रगतीसाठी आवश्यक आहेत. समाजातील एकोपा साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. असे प्रतिपादन जीवन शास्त्री बाबा कवी यांनी केले. तामसा येथील

गोपालकृष्ण मंदिराचा तृतीय वर्धापन दिन व पंचावतार उपहार महोत्सवात केलेल्या प्रवचनात ते बोलत होते. तामसा येथील गोपालकृष्ण मंदिराचा तृतीय वर्धापन दिन व पंचावतार उपहार महोत्सव मंगळवारी मोठ्या थाटात संपन्न झाला.

यानिमित्ताने मंदीर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सकाळी भगवान गोपाळकृष्ण मूर्तीचे मंगलाभिषेक, महापूजा, ध्वजारोहण, धर्मवार्ता, अर्चनाविधी, पंचावतार उपहार, महाआरती व महाप्रसाद वाटप अशा धार्मिक सोहळा पार पडला. यावेळी धर्मसभेचे अध्यक्ष महंत भागवताचार्य प्रभाकर बाबा भोकर हे होते. कार्याध्यक्ष म्हणून महंत संन्याशी बाबा होते. तर प्रमुख प्रवचनकार म्हणून जीवन शास्त्री बाबा कवी होते. धर्मसभेला संबोधित करताना जीवन शास्त्री बाबा कवी म्हणाले, सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे विचार शांती, समता व विश्वबंधुत्वाचे असून समाजाला दिशा देणारे, समाजामध्ये एकोपा निर्माण करणारे आहेत. या विचाराचे प्रत्येकाने अनुकरण करावे. मंदिरे अध्यात्मिक प्रगतीसाठी आवश्यक असून समाजातील एकोपा साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात असे ते म्हणाले. याप्रसंगी महंत गोपीराज बाबा ईजळीकर, नवगावकर बाबा बरडशेवाळा, प्रभाकर बाबा, महंत महिपाल बाबा पोफाळी, महंत बाबा वारंगा फाटा, महंत गौरव दादा संन्याशी, महंत मोघाळीकर बाबा आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन महंत भोजराजदादा अमृते यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महंत प्रभाकरदादा यांनी केले. महंत भोजराज दादा अमृते यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अर्चनाताई अमृते व श्रीकृष्ण मंदिर समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# दहावी-बारावी परीक्षेत गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाई – प्रवीण मेंगशेट्टी

**भोकर : (समर्थ गांवकरी)**




फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (दहावी-बारावी) परीक्षांच्या कालावधीत कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी दिला आहे.

दहावी व बारावीच्या परीक्षा येत्या १० फेब्रुवारीपासून सुरू होत असून या परीक्षा निर्भय, सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात पार पाडाव्यात, या उद्देशाने दिनांक ४ फेब्रुवारी रोजी भोकर तालुकास्तरीय दक्षता समितीची बैठक पार पडली. ही बैठक उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस पोलीस निरीक्षक अजित कुंभार, गटशिक्षणाधिकारी किशनराव फोले, शिक्षण विस्तार अधिकारी सुमन गोणारकर, तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रांचे संचालक, केंद्रप्रमुख तसेच परीक्षा कामकाजात कार्यरत शिक्षण विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी म्हणाले की, नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा.राहुल कर्डिले यांनी दहावी व बारावीच्या परीक्षा पूर्णतः कॉपीमुक्त, निर्भय आणि सुरळीत पार पाडण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने परीक्षा केंद्र संचालकांनी जबाबदारीने कार्य करावे. परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांसाठी ड्यूअल डेस्क, पिण्याचे पाणी, शौचालय व वीजपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्यात. विद्यार्थ्यांना कोणताही मानसिक ताण न येता निर्भय वातावरणात परीक्षा देता येईल,

याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

भोकर तालुक्यात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (बारावी) परीक्षेसाठी दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, श्री शाहू विद्यालय, आणि कै. लक्ष्मणराव घिसेवाड हायस्कूल अशी तीन परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली असून या केंद्रांवर एकूण १,२३७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. तर माध्यमिक प्रमाणपत्र (दहावी) परीक्षेसाठी जिल्हा परिषद हायस्कूल भोकर, मंजुळाबाई किनारकर मुलींचे विद्यालय,भोकर, श्री शाहू महाराज हायस्कूल, भोकर, कै. लक्ष्मणराव घिसेवाड हायस्कूल भोकर, कै. लक्ष्मणराव पाटील हसेकर माध्यमिक विद्यालय लगळूद, माध्यमिक आदिवासी आश्रम शाळा साळवाडी, तसेच नव्याने परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळालेले शिवम शंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दिवशी बु असे एकूण सात परीक्षा केंद्रे कार्यान्वित राहणार असून या परीक्षा केंद्रांवर एकूण १,९५१ विद्यार्थी परीक्षा देणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी किशनराव फोले यांनी बैठकीत दिली. परीक्षेच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करण्यात आल्यातेही त्यांनी स्पष्ट केले.

# मुंबईच्या निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राची कार्यक्षमता व उत्पादन वाढवण्याच्या उद्देशाने Industry and Government Networking for Inclusive Transformation and Empowerment (IGNITE-2026) या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा विकास आयुक्त (उद्योग) दिपेंद्रसिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुंबई शहर अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली. 3 फेब्रुवारी 2026 रोजी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे झाली. कार्यशाळेला उद्योग सह संचालक श्रीमती विजू सिरसाठ, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबईचे अध्यक्ष विजय कलंत्री, एसईपीसीचे प्रतिनिधी विवेक बक्षी, एफआयईओ च्या श्रीमती रिषु मिश्रा, IDBI Capital चे विक्रम जैन, सीप्झ संस्थेच्या श्रीमती शामली बॅनर्जी यांच्यासह विविध क्षेत्रांतील 180 प्रतिनिधी उपस्थित होते.

# टेक फेस्ट 'टेकरॉन २.०'चे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




तंत्रज्ञान, शिक्षण आणि युवकांच्या नेतृत्वाखालील नवोन्मेष यांचे केंद्र म्हणून पुण्याची वाढती ओळख अधिक बळकट करत, अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ (एडीवायपीयू) कॅम्पस, पुणे येथील न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीने आपल्या वार्षिक विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील तंत्रज्ञान महोत्सव 'टेकरॉन 2.0'ची दुसरी आवृत्ती 31 जानेवारी आणि 1 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित केली. या दोन दिवसांच्या महोत्सवाने लोहेगाव कॅम्पसला उच्च ऊर्जा, तंत्रज्ञान, सर्जनशीलता, स्पर्धा आणि विद्यार्थी-चालित नवोन्मेष यांचा संगम असलेल्या वातावरणात रूपांतरित केले.

टेकरॉन 2.0 मध्ये देशभरातील 2,000 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात आयआयटी, आयआयआयटी आणि एनआयटी सारख्या अग्रगण्य संस्थांमधील संघांचाही समावेश होता,ज्यामुळे या महोत्सवाची वाढती राष्ट्रीय ओळख अधोरेखित झाली. तांत्रिक स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रिएटर एंगेजमेंट यांचा विविधतेने भरलेला मिलाफ या फेस्टला प्रदेशातील सर्वात सक्रिय आणि गतिमान विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील तंत्रज्ञान महोत्सवांपैकी एक म्हणून पुढे घेऊन गेला.

टेकरॉन 2.0 च्या केंद्रस्थानी प्रमुख तांत्रिक स्पर्धा होत्या,ज्या नवोन्मेष,सहनशक्ती आणि वास्तव जीवनातील समस्या सोडवण्याच्या कौशल्यांची कसोटी पाहण्यासाठी रचण्यात आल्या होत्या.यात 24 तासांचा जेन-एआय हॅकाथॉन, स्पर्धात्मक प्रोग्रामिंग स्पर्धा तसेच रोबो सॉकर,ड्रोन रेसिंग आणि आरसी रेसिंग यांसारख्या उच्च-उत्साही रोबोटिक्स आणि रेसिंग स्पर्धांचा समावेश होता. या तीन प्रमुख स्पर्धांसाठी प्रत्येकी ₹75,000 चे बक्षीस ठेवण्यात आले होते, ज्यामुळे संपूर्ण महोत्सवात ₹4 लाखांहून अधिक बक्षीस रक्कम वितरित करण्यात आली. विशेषतः 24 तासांचा हॅकाथॉन पूर्ण कालावधीत सातत्यपूर्ण सहभाग आणि सहकार्याचे उदाहरण ठरला.

टेकरॉन 2.0 ने तंत्रज्ञानासोबत संस्कृतीचाही यशस्वी मिलाफ साधला. कॉन्सर्ट नाइट्समध्ये मोठी गर्दी आणि उत्साहपूर्ण सादरीकरणे पाहायला मिळाली. कलाकार अनुज रेहान आणि श्रेया बरुआह यांच्या सादरीकरणांना विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, तर उद्घाटनाच्या रात्री डीजे विश्वेक यांनी मुख्य आकर्षण ठरले.

# आर्थिक वर्ष 2026 च्या तिसऱ्या तिमाहीत 503 कोटी रुपयांचा निव्वळ नफा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत, 31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांना मंजुरी दिली.

1. बँकेच्या कर्ज आणि अग्रिम रकमेतील वार्षिक वृद्धीमध्ये 89% हिस्सा हा मॉर्टगेज कर्ज, वाहन कर्ज, ग्राहक कर्ज, बिझनेस बँकिंग आणि घाऊक कर्जांचा आहे.
   तिसरी तिमाही, आर्थिक वर्ष 2026 दरम्यान बँकेच्या वापरात असलेल्या क्रेडिट कार्डांची संख्या 4.3 दशलक्षांवर पोहोचली आहे.
3. बँकेच्या वेल्थ मॅनेजमेंट व्यवसायात वार्षिक 31% वृद्धी झाली असून, तो Rs. 58,957 कोटींवर पोहोचला आहे.
4. तिमाहीसाठीची तरतूद तिमाही दर तिमाही स्तरावर 3.7% ने घटली असून, ती Rs. 1,452 कोटींवरून Rs. 1,398 कोटींवर आली आहे.

निकालांवर भाष्य करताना बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले की, "आमच्या कर्ज वितरण, ठेवी, वेल्थ मॅनेजमेंट, ट्रान्झॅक्शन बँकिंग यांसारख्या सर्व प्रमुख व्यवसायांमध्ये आम्हाला व्यवसायाची मजबूत गती दिसून येत आहे. 31 डिसेंबर 2025 अखेर एकूण अनुत्पादित कर्ज (जीएनपीए) 1.69% आणि निव्वळ अनुत्पादित कर्ज (एनपीए) 0.53% वर आल्यामुळे आमच्या मालमत्तेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. फंड्सच्या खर्चाबाबत बोलायचे झाले तर, अलीकडेच सेव्हिंग रेट्समध्ये केलेल्या बदलांमुळे त्यात आणखी घट होईल अशी आमची अपेक्षा आहे.

# बिरोबा महाराज वर्धापन दिन व यात्रेनिमित्त स्त्रीरोग कॅन्सर तपासणी शिबिर संपन्न

# आंबड येथील ३७४ महिलांची कॅन्सर तपासणी

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




अकोले तालुक्यातील आंबड येथील जागृत देवस्थान बिरोबा महाराज वर्धापन दिन व यात्रे निमत्ताने भव्य मोफत स्रिरोग, वंध्यत्व निदान कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामपंचायत कार्यालय आंबड, समृद्धी महिला ग्राम संघ अंबड अकोले मेडिकल फाउंडेशन संचलित अकोले हॉस्पिटल अकोले, गावडे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुगाव आणि डॉ.माने मेडिकल फाउंडेशन संचलित साईधाम हॉस्पिटल राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत स्रिरोग वंधत्व निदान कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरामध्ये ३७४ महिलांची मोफत कॅन्सरची तपासणी करण्यात आली. याप्रसंग या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ जालिंदर भोर,आरोग्य मंत्री यांचे ओएसडी डॉ अमोल भोर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बापुसाहेब नागरगोजे, डॉ माने मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ स्वप्रिल माने, सरपंच कविता भोर, उपसरपंच दगडु जाधव, माजी सरपंच रोहिदास जाधव उपस्थित होते. डॉ जालिंदर भोर यांनी वाढतं प्रदुषण स्रि, पुरुषांच्या वाढत्या कॅन्सर आजारांवर मार्गदर्शन केले

डॉ स्वप्रिल माने यांनी सांगितले की, एस.बी.आय.फाउंडेशन मुंबई आणि डॉ माने मेडिकल फाउंडेशन संचलित साईधाम राहुरीच्या माध्यमातून संपूर्ण नगर जिल्ह्यामध्ये कॅन्सर स्क्रीनिंग केली जात आहे याचा उद्देश असा आहे का योग्य वेळी निधन झालं ते आपण पेशंटला 100% वाचू शकतो परंतु कॅन्सर सारख्या आजारावर सुरुवातीच्या काळात व योग्य वेळी निदान होत नसल्याने रुग्ण पैसे खर्च करून देखील वाचण्याची शक्यता कमी असते जास्तीत जास्त गावातील माता-भगिनींनी या तपासण्या करून घ्याव्यात असे आवाहन करून गावकरी यांनी यात्रेनिमित्त सुस्त्य उपक्रम आयोजित केला त्याबद्दल मी यात्रा कमिटी व ग्रामस्थ यांचे आभार व्यक्त करतो.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ नागरगोजे म्हणाले की मी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र आंबड येथे मंजुरी मिळाली आरोग्य केंद्रांच्या जागेची पाहणी करण्यासाठी आलो असता ग्रामस्थांनी यात्रेनिमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन केले डॉ माने मेडिकल फाउंडेशन एस बी आय फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण दुर्गम आदिवासी भागात कॅन्सर तपासणी व जनजागृती केली जाते याबद्दल समाधान व्यक्त केले व उपस्थितांना कॅन्सर तपासणी करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी जेष्ठ नेते गिरजाजी जाधव, पोलिस पाटील भाऊसाहेब कानवडे, संदीप भोर,डॉ प्रकाश वाकचौरे, डॉ तुषार गावडे, सौ.रूपाली वाकचौरे,डॉ, श्रध्दा गावडे, डॉ.अद्वैत देशपांडे,माजी उपसरपंच नाथा भोर, तंटामुक्ती अध्यक्ष भालचंद्र भोर,भोर,प्रा आ.केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ कोळपकर,इंदोरीचे सीएचओ डॉ स्वप्रिल आहेर, ग्रामपंचायत सदस्य प्रमोद भोर, भिकाजी भोर,डॉ वैशाली बल्लाळ, डॉ ऐश्वर्या आरंगळे, डॉ हर्षदा पवार, सोनाली शिंदे,शामवी देशमुख,सुरज विटनोर, कैलास खंडागळे, पोपटराव आधाव, दिपाली वाघमारे, अश्विनी शिंदे, प्राची चौधरी सीआरपी. सविता भोर, शिल्पा भोर, निलिमा भोर,आशासेविका वनिता भोर,मंगल भोर, संपत भोर सर्व आरोग्य कर्मचारी महिला ग्रामस्थ उपस्थित होते.

# टाकरखेड ग्रामपंचायतचा मानस फाउंडेशनकडून सन्मान



**बुलडाणा: (समर्थ गांवकरी)**

विधवा प्रथम मुक्त गाव ही संकल्पना राबवणे आजची गरज आहे. टाकरखेड ग्रामपंचायतीने विधवा महिलांच्या उन्नतीसाठी पाऊल टाकले, हाच कित्ता जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतींनी पुढाकार घेऊन राबवावा व विधवा प्रथा मुक्त गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने यांनी टाकरखेड मु.येथे आज केले.

टाकरखेड ग्रामपंचायत ने विधवा प्रथा निर्मूलनासाठी पुढाकार घेत नवे पाऊल टाकले आहे. ग्राम पंचायत सरपंच लता डहाके व ग्रामसेविका एस पी माने यांनी पुढाकार घेत महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात त्यांनी विधवा महिलांना सन्मान जनक स्थान दिले. समाजाने दूर ठेवलेल्या भगिनींना ग्रामसेविका माने यांनी बोलावून त्यांना ग्रामपंचायत च्या वतीने भेट ही दिली.विधवा महिलांना जाचणाऱ्या कुप्रथा निर्मूलनासाठी ग्रामपंचायत ने विशेष पुढाकार घेतला. याबद्दल मानस फाउंडेशनच्या वतीने आज 4 फेब्रुवारी रोजी टाकरखेड येथे त्यांचा सन्मान करण्यात आला. फाउंडेशनचे अध्यक्ष डी एस लहाने ,उपाध्यक्ष गणेश निकम,संचालक प्राचार्य शाहीनाताई पठाण, प्रा. ज्योती पाटील, प्रतिभा भुतेकर, स्वाती सावजी ,अँड संदीप जाधव आदी सदस्यांनी टाकरखेड ग्रामपंचायतला भेट दिली. ताराबाई शिंदे यांची प्रतिमा,पुस्तके व सन्मानचिन्ह देऊन सरपंच व ग्रामसेविका माने यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला गावातील बहुसंख्य महिलांची उपस्थिती लाभली. पुढे बोलताना प्रा. डी एस लहाने म्हणाले, विधवा महिलांसाठी जिजाऊ साहेबांनी काम केले हा त्यांचाच जिल्हा आहे. आपल्याच घरातील एक महिला इतिहासामध्ये मोठा आदर्श उभा करून गेली आहे. राज्याभिषेकाच्या वेळी जिजाऊ स्वतः उपस्थित होत्या. त्यांनी विधवा प्रथा पाळली नाही. महात्मा बसवेश्वर व चक्रधरांनी सुद्धा या महिलांना सन्मानाचे स्थान दिले आहे. त्यामुळे महापुरुषांचे विचार पुढे नेत आपण काळानुरूप बदलले पाहिजे असे सांगितले. तर ग्रामसेविका माने यांनी आपणच आपली ढाल बना, खंबीर व्हा, तलवारी सारखे टोकदार बना, जर आपण तसे झालो तर आपले शोषण करण्याची हिम्मत कोणाची होणार नाही असे सांगून आपल्या उद्धारासाठी आपणच पुढे आले पाहिजे असे सांगितले. ज्योती पाटील यांनी संकटांना भिडले पाहिजे व महिला म्हणून आपण मुलांना महिलांचा आदर शिकवला पाहिजे असे सांगितले. प्राचार्य शाहिना ताई पठाण यांनी मानस फाउंडेशनच्या कार्याची माहिती दिली. स्वाती सावजी यांनी छोटे छोटे बदल जीवनात बरेच काही घडवून जातात,नवीन विचार स्वीकारला पाहिजे असे आवाहन केले.बेटी बचाव बेटी पढाव व बालविवाह मुक्त भारत कार्यक्रमाच्या प्रतिभा भुतेकर यांनी उपस्थित महिलाना शपथ दिली , संकटग्रस्त महिलांसाठी असलेल्या शासकीय सोयी सुविधा योजनांची माहिती या वेळी देण्यात आली. संचलन निवृत्त मुख्याध्यापक खेंते सर यांनी केले.आभार अँड.संदीप जाधव यांनी मानले कार्यक्रमात प्रा. डी एस लहाने यांनी विधवा चळवळी विषयी माहिती दिली.

महिलांनी महिलांच्या उन्नतीसाठी पुढे आले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी गावातील विधवा महिलांनी त्यांच्या समस्या मांडल्या तर ग्रामसेविका एस पी माने व प्रा. लहाने यांच्या आवाहनानुसार उपस्थित महिलांनी ग्रामपंचायत समोर विधवा प्रथा न पाळण्याची शपथ घेतली.

# सोनालिकाने १.५१ लाख ट्रॅक्टर विक्रीची केली नोंद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आपल्या ३० व्या वर्धापन दिनाच्या भव्य सोहळ्याची २०२६ मध्ये प्रभावी सुरुवात करत भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टरने एप्रिल' २५ ते जानेवारी' २६ दरम्यान आतापर्यंतच्या सर्वात जलद १,५१,६०४ ट्रॅक्टरची तारखेपर्यंतच्या वर्षात (वायटीडी) विक्री केली आहे. भविष्यानुकूल तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या हेवी-ड्युटी ट्रॅक्टरच्या आधारे सोनालिका विविध प्रदेशांमध्ये कृषी समृद्धीचे नेतृत्व करत आहे. वाढते यांत्रिकीकरण आणि ग्रामीण पायाभूत सुविधांमध्ये वाढत्या गुंतवणुकीमुळे विकसनशील कृषी क्षेत्रात दीर्घकालीन मागणीला चालना मिळत आहे. सातत्याने वाढ करण्याची सोनालिकाची क्षमता यातून प्रतिबिंबित होते. सोनालिकाने नुकतेच व्यापक अखिल भारतीय ब्रँड बळकटीकरण कार्यक्रमाचा भाग म्हणून जिंकण्याची क्षमता ('जीतने



का दम') प्रदान करण्याच्या ब्रँडच्या उद्देशाची पुष्टी केली आहे. त्यातून ब्रँडच्या आक्रमक वाढीच्या धोरणाचे प्रतिबिंब पडले आहे. स्थापनेपासून अवघ्या ३० वर्षांत सोनालिका ही छोट्या शहरातील एका कंपनीपासून भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड आणि देशातील तिसरा सर्वात मोठा ट्रॅक्टर ब्रँड बनली आहे. तसेच जागतिक पातळीवर पाचवा सर्वात मोठा ट्रॅक्टर ब्रँड म्हणून स्थान मिळवले आहे. सोनालिकाच्या प्रगतीचा हा प्रवास काटकसरीची अभियांत्रिकी, उत्पादनाचा अतुलनीय विस्तार आणि अटळपणे शेतकरी-प्रथम दृष्टिकोनावर आधारित या शक्तिशाली मूलभूत तत्त्वांवर आधारलेला आहे. त्यामुळे शेतकरी सोनालिका कंपनीच्या हेवी ड्युटी ट्रॅक्टरकडे दीर्घकालीन वाढीचे साधन या दृष्टीने पाहतात. जीएसटी सुधारणांमुळे शेतकऱ्यांच्या उत्साह आणि यांत्रिकीकरणाला चालना मिळाली आहे, त्यामुळे अधिक अपेक्षितता आली आहे. त्याचवेळेस जगातील सर्वांत मोठा एकात्मिक असा सोनालिकाचा ट्रॅक्टर कारखाना पूर्णपणे सुसज्ज आहे. शेतकऱ्यांना त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि भारताच्या आर्थिक प्रवासात शेतीच्या भूमिकेला बळकटी आणण्यासाठी भविष्यवेधी उत्पादने पुरविण्याकरिता तो तयार आहे. या नवीन कामगिरीबद्दल विचार मांडताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, या हंगामात रब्बी पेरणी उत्तम झाली आहे, त्यामुळे चांगले पीक येण्याची आशा निर्माण झाली आहे आणि शेतकऱ्यांना आमच्या इंधन-कार्यक्षम, आरामदायी आणि शक्तिशाली ट्रॅक्टरचा लाभ घेता आला आहे.

# पुण्यात नवीन सुविधेसह कोल्डस्टार लॉजिस्टिक्स
## महाराष्ट्रात आपला ठसा वाढवत आहे

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात वेगाने वाढणारी तापमान-नियंत्रित पुरवठा साखळी समाधान प्रदाता, कोल्डस्टार लॉजिस्टिक्सने पुण्यात आपली दुसरी अत्याधुनिक कोल्डसाखळी सुविधा उघडली आहे. यामुळे महाराष्ट्रात प्रक्रिया आणि प्रक्रियेसह एफएमसीजी आणि फळे आणि भाज्यांच्या उत्पादन आणि वितरणावर कंपनीचे लक्ष आणखी मजबूत होईल. चाकण फेज II मध्ये स्थित, २,२०,००० चौरस फूट तापमान-नियंत्रित गोदाम जलद गतीने वाढणारी पुणे उपभोग बाजारपेठ आणि विश्वसनीय शीतगृह आणि प्रक्रिया पायाभूत सुविधांची वाढती प्रादेशिक मागणी पूर्ण करण्यासाठी बांधण्यात आले. या सुविधेची दैनिक प्रक्रिया क्षमता ३००,०००+ युनिट्स आहे आणि ती पुणे आणि आसपासच्या अंतर्गत महाराष्ट्रासाठी एक मध्यवर्ती केंद्र म्हणून काम करते, ज्यामुळे तापमान-संवेदनशील वस्तूंची जलद आणि अधिक कार्यक्षम वाहतूक शक्य होते. हे नवीन केंद्र आधुनिक व्यापार, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, फूड प्रोसेसर आणि संस्थात्मक ग्राहकांची मागणी पूर्ण करून एफएमसीजी उत्पादने आणि ताज्या उत्पादनांचे साठवणूक, प्रक्रिया आणि वितरण करण्यास समर्थन देईल. कोल्डस्टार आधीच पुण्यातील चाकण फेज II मध्ये आणखी 35,000+ चौरस फूट सुविधा चालवत आहे आणि दुसरे केंद्र या प्रदेशात कंपनीची क्षमता आणि सेवा क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ करेल. आधुनिक वेअरहाऊसिंग पायाभूत सुविधा, ऊर्जा-कार्यक्षम प्रणाली आणि कोल्डस्टारच्या स्वतःच्या एआय/एमएल-चालित लॉजिस्टिक्स प्लॅनिंग टूल्ससह सुसज्ज, ही सुविधा थ्रूपुट सुधारण्यासाठी, हाताळणीचा वेळ कमी करण्यासाठी आणि पुरवठा साखळीमध्ये एंड-टू-एंड उत्पादन अखंडता सुनिश्चित करण्यासाठी डिझाइन केलेली आहे. या विस्तारावर भाष्य करताना, कोल्डस्टार लॉजिस्टिक्सचे कार्यकारी संचालक समीर वर्मा म्हणाले: "पुणे हे एफएमसीजी आणि ताज्या उत्पादनांसाठी एक प्रमुख वापर आणि वितरण केंद्र म्हणून उदयास आले आहे. वाढती प्रादेशिक मागणी, जलद-वाणिज्यातील वाढ आणि प्रक्रिया-नेतृत्वाखालील कोल्ड चेन सोल्यूशन्सची वाढती गरज यामुळे आम्हाला येथे विस्तार करण्यास प्रवृत्त केले आहे. देशातील लॉजिस्टिक्स तज्ञांच्या मदतीने पुणे आणि बाजारपेठेत अधिक जलद सेवा देण्याची आमची क्षमता या दुसऱ्या केंद्राने बळकट केली आहे."

# त्र्यंबकेश्वर येथील १० आखाड्यांच्या विकासकामांचे भूमिपूजन संपन्न!

**त्र्यंबकेश्वर: (समर्थ गांवकरी)**

दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.४० ते ४.४५ या वेळेत कुंभमेळा तथा जलसंपदा मंत्री मा. श्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत जुना आखाडा, पिंपळद रोड, त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा २०२७ निमित्त आखाड्यांच्या प्रस्तावित विकासकामांचे भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत रवींद्रपुरी महाराज, महामंत्री महंत हरिगिरीजी महाराज, आनंदा आखाड्याचे महंत शंकरानंद सरस्वती महाराज, निरंजनी आखाड्याचे महंत धनंजय गिरी महाराज, तसेच पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे, त्रिविक्रम जोशी (पुरोहित संघ, नाशिक) व पंचदशनाम जुना आखाड्याचे साधू-संत व सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रशासनाच्या वतीने विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, तहसीलदार गणेश जाधव, नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास १७५ ते २०० भाविक व नागरिकांची उपस्थिती होती.

भूमिपूजनानंतर बोलताना महंत हरिगिरी महाराज यांनी मुख्यमंत्री व कुंभमेळा मंत्र्यांचे आभार मानत सांगितले की, आजपासून खऱ्या अर्थाने कुंभमेळ्याचा घोष झाला आहे. सर्व देवी-देवतांचे नाशिक येथे आगमन झाले असून त्या येथे विराजमान झाल्या आहेत.

आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत रवींद्रपुरी महाराज यांनी सांगितले की, त्र्यंबकेश्वर येथील सर्व १० आखाड्यांच्या विकासकामांचे भूमिपूजन आज करण्यात आले असून मुख्यमंत्री व कुंभमेळा मंत्र्यांचे साधू समाजाच्या वतीने आभार मानतो.

कुंभमेळा मंत्री श्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, आजपासून खऱ्या अर्थाने कुंभमेळ्याच्या कामांना सुरुवात झाली आहे. आगामी कुंभमेळ्यात मागील कुंभपेक्षा ४ ते १० पट अधिक भाविक येणार आहेत. त्यामुळे सर्व आखाड्यांना मूलभूत सुविधा दिल्या जातील.

त्र्यंबकेश्वर येथील आखाड्यांनी ३ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली होती. याबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, आखाड्यांच्या कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.

यावेळी त्यांनी नाशिक महानगरपालिकेतील भाजप बहुमत, महापौरपदासाठी हिमगौरी आडके, उपमहापौरपदासाठी मच्छिंद्र सानप यांनी अर्ज भरल्याची माहिती देत महायुतीच्या माध्यमातून कारभार केला जाईल, असे सांगितले.

मिडियाशी बोलताना महंत शंकरानंद सरस्वती महाराज म्हणाले की, आज सर्व १० आखाडे समाधानी असून प्रशासन व सरकारच्या सोबत आहोत. सिंहस्थ काळात साधूंना ओळखपत्र देण्यात येणार असून नकली साधूंना आळा बसणार आहे. प्रशासनासोबत समन्वय ठेवून काम करू.

कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी पुढे सांगितले की, सिंहस्थ कुंभमेळ्यात AI च्या माध्यमातून संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवले जाईल. नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्ता ६ पदरी केला जाईल, रिंग रोडचा विकास, STP प्रकल्प, घाट विकास, पाणी लिफ्ट योजना आदी कामे येत्या वर्षभरात पूर्ण केली जातील.

कार्यक्रमानंतर उपस्थित साधू-महंत व अधिकाऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

# अकोले तालुक्यात अवैध दारूचा काळा खेळ बिनधास्त सुरू

- ७० बळी गेले तरी पोलिसांची अनास्था कायम!
- दुध गाडीतुन दारू व गुटख्याची वाहतूक



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील इंदोरी फाटा, विरगाव फाटा आणि समशेरपूर परिसरात अवैध दारू विक्री व इतर बेकायदेशीर व्यवसाय अनेक वर्षांपासून खुलेआम सुरू असून, या बनावट दारूमुळे आतापर्यंत किमान ७० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. विशेष म्हणजे हा आकडा पोलीस यंत्रणेच्या रेकॉर्डमध्ये असतानाही मुख्य सूत्रधारांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

रात्रीस खेळ चाले, या म्हणीप्रमाणे गुजरात राज्य व सिन्नर तालुक्यातून खाजगी ॲम्ब्युलन्स गाड्यांद्वारे बनावट दारूचा पुरवठा केला जात असल्याचे उघड झाले आहे. आरोग्य सेवेसाठी असलेल्या ॲम्ब्युलन्सचा दारू वाहतुकीसाठी सर्रास गैरवापर होत असताना पोलिस पेट्रोलिंगदरम्यानही या गाड्यांची तपासणी केली जात नाही, हे विशेष!

अकोले तालुका विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी अनेक वेळा पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन अवैध दारू विक्री तात्काळ बंद करण्याचे स्पष्ट आदेश दिले. सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनीही वारंवार पोलिसांशी संवाद साधत या प्रश्नाकडे लक्ष वेधले. मात्र, या सर्व आदेशांना केराची टोपली दाखवत पोलिस यंत्रणा बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र आहे.

कारवाई करताना सर्वसामान्य गोरगरीब तरुणांवर गुन्हे दाखल केले जातात, मात्र नगर जिल्ह्यातील तथाकथित 'किंगमेकर' मात्र मोकाट फिरत आहे.

"मी सगळ्या पोलीस अधिकाऱ्यांना सांभाळतो, माझं कोणी काही वाकडं करू शकत नाही," असे तो उघडपणे सांगत फिरत असल्याची चर्चा आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या उत्तर भागात अनेक गुन्हेगारांवर तडीपार कारवाईचे प्रस्ताव तयार करण्यात आले. मात्र, अकोले तालुक्यातील एकाही अवैध धंदेवाल्यावर तडीपारची कारवाई का नाही? अनेकांच्या फाईल्स तयार असूनही त्या पुढे का जात नाहीत, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

विरगाव फाटा, इंदोरी फाटा येथे मोठी आंदोलने, दारू जप्ती, वाहन जप्ती अशा कारवाया झाल्या. पण मुख्य आरोपी मात्र कायम सुरक्षित. अनेक मृत्यूची प्रकरणे पैशांद्वारे दाबली गेल्याचा आरोप होत आहे. या तडजोडीमध्ये प्रवरा परिसरातील एका माजी सरपंचाची मध्यस्थी असल्याचीही चर्चा आहे.

लोटे वस्ती ते निरगुडवाडी परिसरात कोट्यवधी रुपयांचा जुगार क्लब सुरू असून, सिन्नर, नाशिक, पुणे, ओतूर भागातील सट्टेबाज येथे खेळ खेळत असल्याची माहिती आहे. स्थानिक बीट पोलीस कारवाईपूर्वीच सूचना देतात, त्यामुळे धंदे काही दिवस बंद ठेवले जातात, असा गंभीर आरोप आहे.

राजूर शहर, आदिवासी भागात दारूबंदी असतानाही किराणा दुकानांतील फ्रिजमध्ये सांकेतिक कोडने दारू विक्री सुरू आहे. माजी सरपंच हेमलता पिचड यांनी ११२ गावांत ग्रामसभेत दारूबंदीचे ठराव मंजूर करून घेतले, तरीही पोलीस व उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध धंद्यांना अभय दिले जात आहे.

कोतुळ, सावरचोळ फाटा, शेरणखेल, पिंपळगाव नाकविंदा या संपूर्ण परिसरात अवैध व्यवसाय बिनधास्त सुरू असताना अकोले तालुक्यातील पोलीस यंत्रणा निष्क्रिय ठरत असल्याचा आरोप आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून 'त्या किंगमेकरवर' कारवाई करावी, अन्यथा आणखी किती बळी गेल्यावर प्रशासन जागे होणार, असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. तर चक्क लाखों रुपये फोरच्युनर स्कारपियो महागड्या गाड्या घेऊन काळ्या काचा करून माल वाहतूक करणारे देखील हिंदुत्ववादी संघटनांच्या नावाखाली दारूचा मालवाहतूक करतात त्यांचा बुरखाधारी पर्दाफाश केला जाईल अकोल्यातील सिंघम पोलीस अधिकारी याकडे लक्ष घालतील तर बिट हवालदार यांचे मोबाईल सिडीआर चेक होईल का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे तर सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्या निवेदनात दुकानदार यांच्या वर कारवाई पोलीस यंत्रणा का करत नाही.


### उत्पादन शुल्क विभागावरही संशय

उत्पादन शुल्क विभागाचे पथक दर महिन्याला परवाना असलेल्या बारमध्येच तपासणी करून हप्ते वसूल करण्यात धन्यता मानत असल्याचा आरोप होत असून, या अधिकाऱ्यांवर अँटी करप्शन विभागाने चौकशी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# व्यावसायिक वाहन चालकांसाठी मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

वाहनचालकांच्या डोळ्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी एएसजी आय हॉस्पिटल, फर्ग्युसन कॉलेज रोड, शिवाजीनगर तसेच कोकणे चौक, पिंपळे सौदागर (पिंपरी चिंचवड) येथे चालक दृष्टी मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम २० जानेवारी पासून सुरु झाली असून ११ फेब्रुवारी पर्यंत सुरू राहणार आहे. या विशेष उपक्रमांतर्गत सर्व व्यावसायिक वाहनचालकांसाठी (ऑटो, ट्रक, कॅब चालक) मोफत डोळे तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासाठी चालकांकडे वैध ड्रायव्हिंग परवाना असणे बंधनकारक आहे. रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने स्पष्ट दृष्टी आवश्यक असून, रात्री वाहन चालवताना किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासात दृष्टी कमी पडल्यामुळे अनेक अपघात घडतात.



या पार्श्वभूमीवर चालकांना त्यांच्या डोळ्यांची काळजी घेण्यास प्रोत्साहित करणे हा मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. दृष्टिदोषामुळे होणाऱ्या अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी अशा प्रकारच्या मोफत तपासणी आणि शस्त्रक्रिया उपयुक्त ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. व्यावसायिक वाहनचालकांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देणे आणि रस्ते सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे या उद्देशाने एएसजी आय हॉस्पिटलचा हा उपक्रम सध्या वाहनचालकांकडून उत्साहाने प्रतिसाद मिळवत आहे.

# २.८० लाखांचा मुद्देमाल जप्त



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, कंधार पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करून मोठा मुद्देमाल हस्तगत केला आहे अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली . दिनांक २८ जानेवारी २०२६ ते २९ जानेवारी २०२६ च्या दरम्यान मौजे आनंदवाडी घोडज ते बोरी जाणारे रोडवर चोरी झाली होती . याप्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता . गुन्ह्याचा तपास करत असताना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, चोरीस गेलेले ट्रॅक्टरची ट्रॉली व सेंट्रींगचे साहित्य हळदव शिवार ता. लोहा येथे आहे . या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून गोविंद व्यंकटी चोंडे आणि ओमकार बालकिसन चोंडे (दोघे रा. घोडज, ता. कंधार) या आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून एकूण २,८०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, ज्यात ट्रॅक्टरची ट्रॉली, सेंट्रींग प्लेट्स आणि टँकरचा समावेश आहे . या कामगिरीबद्दल मा. पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले आहे .

# कावीळचा कहर; प्रशासनाच्या बेपर्वाईने आदिवासी विद्यार्थ्यांचे आयुष्य धोक्यात

- उपचाराऐवजी घरी हाकलले; शिक्षकांच्या बेजबाबदार भूमिकेने विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतण्याची भीती

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट तालुक्यातील सहस्त्रकुंड येथील एकलव्य निवासी शाळा आज विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे मंदिर न राहता आजारांचे केंद्र बनली असून, मागील एक महिन्यापासून कावीळ (Viral Hepatitis) या घातक आजाराने तब्बल ४० ते ५० आदिवासी विद्यार्थ्यांना ग्रासले आहे. मात्र या गंभीर परिस्थितीकडे शाळा प्रशासन, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय आणि संबंधित आरोग्य यंत्रणा जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा संतप्त आरोप करण्यात येत आहे.

एकलव्य निवासी शाळा सहस्त्रकुंड येथील कावीळ (Viral Hepatitis) प्रकरणात आणखी धक्कादायक बाब समोर आली असून, शाळेतील



शिक्षक व कर्मचारी आजारी विद्यार्थ्यांना तात्काळ वैद्यकीय उपचार देण्याऐवजी थेट घरी पाठवून देत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. ही बाब केवळ निष्काळजीपणाची नसून, विद्यार्थ्यांच्या जीवाशी केलेली अमानवी व गुन्हेगारी स्वरूपाची वागणूक असल्याची तीव्र टीका होत आहे.

कावीळसारखा संसर्गजन्य व गंभीर आजार असताना विद्यार्थ्यांना तज्ञ डॉक्टरांकडे दाखवणे, त्यांना निरीक्षणाखाली ठेवणे व योग्य उपचार देणे अपेक्षित असते. मात्र येथे शिक्षकांनी स्वतः जबाबदारी झटकून, "घरी जा" असा सल्ला देत विद्यार्थ्यांना पालकांच्या माथी मारल्याचा आरोप आहे. यामुळे अनेक विद्यार्थ्यांची प्रकृती अधिक खालावल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सहसचिव तथा वैद्यकीय तज्ञ डॉ. पुंडलिक आमले (एम.बी.बी.एस.) यांनी दिलेल्या निवेदनात प्रशासनावर थेट हल्ला चढवला असून, "ही केवळ निष्काळजीपणा नसून आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवाशी उघड उघड खेळ करण्याचा प्रकार आहे," असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.

डॉ. आमले यांनी तपासलेल्या विद्यार्थ्यांच्या रक्तचाचण्यांमध्ये Sr. Bilirubin अत्यंत धोकादायक पातळीवर आढळून आले असून अनेक विद्यार्थ्यांना Viral Hepatitis ची तीव्र लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तरीही संतापजनक बाब म्हणजे, पॉझिटिव्ह आढळलेले विद्यार्थी योग्य उपचार न देता थेट घरी पाठवण्यात आले आहेत. हा प्रकार म्हणजे प्रशासनाने स्वतः हाताने संकट ओढवून घेण्यासारखाच असल्याची तीव्र टीका होत आहे. या रोगाचे मुख्य कारण दूषित पाणी व निकृष्ट अन्न असल्याचे स्पष्ट झाले असतानाही, अद्याप पाणीपुरवठा, स्वयंपाकगृह, साठवणूक व स्वच्छतेची कोणतीही चौकशी झालेली नाही. प्रश्न असा आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य इतके स्वस्त आहे का, की त्यांच्या जीवाशी असा खेळ मोकळेपणाने करता येतो?

डॉ. आमले यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देताना म्हटले आहे की, "जर या प्रकरणात एखाद्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाचीच असेल. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई झाली नाही, तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल." एकलव्य शाळा या आदिवासी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उभारण्यात आल्या; मात्र सहस्त्रकुंड येथील शाळेत सुरू असलेली ही बेफिकीर कारभारशाही पाहता, शासनाच्या योजना फक्त कागदावरच जिवंत आहेत की काय, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणात शाळा प्रशासन, प्रकल्प कार्यालयातील जबाबदार अधिकारी आणि आरोग्य विभाग यांची तात्काळ चौकशी करून निलंबनाची कारवाई झाली पाहिजे, अशी जोरदार मागणी होत आहे. प्रशासनाने आता तरी जागे न झाल्यास, आदिवासी समाजाचा उद्रेक रोखणे कठीण जाईल, असा इशाराही सामाजिक कार्यकर्त्यांकडून देण्यात येत आहे.